
# माणूस

शनिवार । ३ डिसेंबर १९७७ । ७५ पैसे




## साहित्यसंमेलन उधळण्याचा प्रयत्न होता का ?

## साप्ताहिक माणूस

वर्ष सतरावे–अंक सत्तावीस

३ डिसेंबर १९७७

मूल्य पंचाहत्तर पैसे

संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे
◘
वार्षिक वर्गणी :
**चाळीस रुपये**
◘
प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.
◘
राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.
◘
**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव पेठ,
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०
◘
दूरध्वनी : ४३४५९
◘


# न मोडलेले पण वाकलेले संमेलन

श्री. ग. मा.

पुण्यात भरलेला बावन्नावे मराठी साहित्य-संमेलन उधळले गेले, संमेलनाचा बोजवारा उडाला अशी हवा निर्माण झालेली आहे. ज्याला जी माहिती मिळाली त्यानुसार या घटनेची चिकित्सा सध्या सुरू आहे. उलटसुलट मतप्रदर्शने, आरोपप्रत्यारोप चालू आहेत; पण संमेलनाला आलेल्या सहस्रावधी प्रतिनिधींच्या, संमेलन यशस्वी करण्यासाठी गेले ३।४ महिने काबाडकष्ट करणाऱ्या सर्वसामान्य कार्यकर्त्यांच्या दृष्टीने पाहता वस्तुस्थिती वेगळी आहे, याकडे अद्याप तरी कुणा चिकित्सकाचे लक्ष गेलेले दिसत नाही. संमेलन एकूण तीन दिवस होते. यापैकी पहिल्या दोन दिवसांचे कार्यक्रम तर कुठलाही विरोध न होता व्यवस्थित पार पडलेले आहेत. पहिल्या दिवशीचा उद्घाटनाचा सोहोळा उरकल्यावर मंडपातील सर्वसाधारण प्रतिक्रिया 'रटाळ कार्यक्रम' इतकीच होती. श्रीमती दुर्गाबाई भागवत यांच्या दहा-बारा मिनिटांच्या भाषणामुळे या पहिल्या दिवशीच्या सोहोळ्याला थोडाफार उजळा मिळाला नसता तर मंडप लवकर रिकामाही झाला असता. महामंडळाचे अध्यक्ष कवी अनिल यांनी महामंडळाच्या घटनेवर चऱ्हाट लावले, तर स्वागताध्यक्ष श्री. ग. ल. ठोकळ यांनी पुण्यनगरीचा शिवकालापासूनचा इतिहास-भूगोल कथन करून श्रोत्यांच्या सहनशक्तीला भलताच ताण दिला. शिवाजी आणि दादोजी कोंडदेव यांनी उध्वस्त आणि उजाड झालेल्या पुण्याची भूमी सोन्याच्या नांगराने नांगरून लोकांत विश्वास व आशा निर्माण केली, ही ऐकूनऐकून कंटाळवाणी झालेली कथाही त्यांनी आपल्या भाषणात विस्ताराने सांगितली. ही ऐकताना सारखे वाटत होते, की आता महाराज प्रत्यक्ष अवतरणार आणि हा सोन्याचा नांगर जप्त करणार! शिक्षा म्हणून सगळ्यांनाच किर्लोस्करांच्या लोखंडी नांगराला जुंपून निदान एक हेक्टरभर जमीन तरी नांगरून घेणार! संमेलनाध्यक्षांच्या भाषणातही हा नगरस्तुतीचा भाग फार लांबला. थेट चाफेकर-बंधूंपासून सुरुवात करायची म्हणजे असे होणारच. दुसऱ्या दिवशीच्या कार्यक्रमांना यावेसे वाटावे असे छान, उत्साहवर्धक वातावरण या पहिल्या दिवशीच्या सोहोळ्याने निर्माण केले नव्हते. निसर्गाने कृपा केली; पाऊस पडला नाही; पण रटाळ भाषणांमुळे पाऊस पडला असता तर बरे झाले असते असे वाटायला लावले. तरीही श्रोत्यांनी, प्रतिनिधींनी दुसऱ्या दिवशीच्या कार्यक्रमांना गर्दी केली. दोन्ही परिसंवाद, कोशकर्त्यांचे सत्कार, रात्रीचे मनोरंजन हे सर्व कार्यक्रम योजल्याप्रमाणे व्यवस्थित पार पडले.

प्रश्न आहे तिसऱ्या दिवशीचा. त्या दिवशी सकाळी कवीसंमेलन होते. पाडगावकरांच्या कवितावाचनाच्या सुरुवातीला व्यासपीठावर काही जयप्रकाशवादी तरुणांनी केलेल्या घोषणा वगळता हाही कार्यक्रम व्यवस्थित योजल्याप्रमाणे पार पडला. दलित पँथरचे काही निदर्शक व्यासपीठावर चढले हे खरे; पण त्या वेळी कविसंमेलनाचा कार्यक्रम समाप्त झालेला होता. मंडप जवळजवळ रिकामाच होता. त्यानंतरचा दुपारचा भाषाभगिनीपरिचयाचा कार्यक्रमही व्यवस्थित झाला. मंडपाच्या बाहेर गटागटाने काही हालचाली तिसऱ्या दिवशी सकाळी व दुपारी

चालू होत्या हे खरे आहे; पण या हालचालीचा परिणाम व्यासपीठावर काही जाणवत नव्हता. कार्यक्रमाच्या कुवतीप्रमाणे मंडप भरत होता, रिकामा राहात होता, इतकेच. तीन दिवसापैकी अडीच दिवस समेलन येणेप्रमाणे व्यवस्थित पार पडत होते. गडबड फक्त शेवटच्या अर्ध्या दिवसाच्या खुल्या अधिवेशनाच्या कार्यक्रमात झाली आणि याही गडबडीचे दोन भाग अगदी सरळसरळ पडलेले दिसत होते. खुले अधिवेशन सुरू झाले आणि विषयनियामक समितीने केलेला दुर्गाबाई भागवत यांच्या निषेधाचा ( खेदप्रदर्शनाचा ! ) ठराव मागे घेतला जावा किंवा खुल्या अधिवेशनासमोर येऊ द्यावा या मागणीसाठी झालेली गडबड हा पहिला भाग. दुसरा भाग हा भावेविरोधी गडबडीचा. यापैकी ठरावासंबंधीची पहिली गडबड सुमारे अर्धा तास चालली व अध्यक्षानी विषयनियामक समितीचा ठराव रद्द केल्याचे जाहीर केल्यावर पुन्हा खुल्या अधिवेशनाचे कामकाज व्यवस्थित चालू झाले. सगळे ठराव समत करून झाले. महत्त्वाच्या ठरावावर ग. प्र. प्रधान, श्री. पु. गोखले याची भाषणे झाली, तीही श्रोत्यांनी शातपणे ऐकून घेतली. यानतर मूळ योजनेपैकी अध्यक्षीय भाषणाचा व आभारप्रदर्शनाचा कार्यक्रम राहिला होता. तेवढा कार्यक्रम भावेविरोधी निदर्शनांमुळे होऊ शकला नाही. यापैकी भावे याच्या अध्यक्षीय भाषणाचा कार्यक्रमही रात्री श्रोत्याच्या प्रचंड उपस्थितीत पार पडला. तेव्हा एकूण संमेलनाचा विचार करता मडपकत्राटदाराचे व ज्यानी ज्यानी समेलनाला मदत केली त्या सर्वांचे आभार मानण्याचा उपचार वगळता श्रोत्यांना–प्रतिनिधीना योजले गेलेले सर्व काही व्यवस्थित ऐकायला – पाहायला मिळाले अशी वस्तुस्थिती आहे. समेलनाला गालबोट लागले हे कुणीच नाकारू शकत नाही; पण समेलन मोडले, समेलनाचा बोजवारा उडाला हा प्रचार चुकीचा, निदर्शनांना अवास्तव महत्त्व देणारा, कार्यकर्त्यांवर अन्याय करणारा आहे. खाजगी वैमनस्ये कुठे नसतात ? तशी ती याही समेलनात होती. जे डुढ्ढाचार्य होते त्यांचा दुर्गाबाईवर राग होता – ज्यात मत्सरभाव नसेलच असे सांगवत नाही. भावे निवडून आले म्हणून काही मंडळी नाराज होती. त्याचे आतून काड्या घालण्याचे उद्योग सुरूच होते. महामंडळ, साहित्यपरिषद, नगर वाचन मंदिर या यजमान सस्थाचा ताळमेळ जमलेला नव्हता. स्वयसेवक अननुभवी होते. पैसा तर कमी होताच. बड्या मडळीचे रूसवेफुगवे, मानपान विचारात घ्यावे लागत होते. अशा मोठ्या समेलनाचे यजमानपद म्हणूनच कुणी स्वीकारायला सहसा तयार होत नाही. प्रत्येक समेलन म्हणजे मोठ्याचा खेळ आणि लहानाचे जीव जाणे. पुण्याच्या समेलनात जे घडले ते यापेक्षा फार काही विलक्षण, वेगळे होते असे मानायचे कारण नाही. समेलन रगले का नाही, रटाळत आणि ढेपाळत का राहिले हा प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे. निदर्शनाचा फार बाऊ करण्यात अर्थ नाही. समेलन उधळण्याचा तरुणानी प्रयत्न केला असेलही. याबद्दल त्याना जो काही दोष द्यायचा असेल तो अवश्य दिला जावा; पण म्हाताऱ्यांनी समेलन कंटाळवाणे करून श्रोत्याची सहनशक्ती ताणत राहण्यापेक्षा वेळच्या वेळी निवृत्त होणे, युक्तीच्या चार गोष्टी सागण्यापुरतेच जवळपास असणे, हे अधिक शोभादायक ठरले नसते काय ? कुणाला नीट ऐकूच येत नाही. कुणाला काठीशिवाय चालताच येत नाही सन्मानाचा हार गळयात घालून घेण्यासाठी उठायचे तर उठवतही नाही, अशी काहीची स्थिती ! तीनही दिवस वार्धक्याचे हे केविलवाणे प्रदर्शन प्रेक्षकासमोर माडले जात होते. वार्धक्याची एक करुण छाया आगळ्या अधिवेशनावरच ओघळलेली दिसत होती. तरुणाच्या अतिरेकी उत्साहाइतकीच ही वार्धक्याची अटळ विकृतीही, समेलनात जो काही थोडाफार गोधळ शेवटी झाला, त्याला कारणीभूत आहे. कवी अनिल हे विकृतीचे एक टोक असेल. पण इतराचीही कमीअधिक प्रमाणात या प्रकृति–दोषापासून सुटका नाही. चैतन्याची हवा समेलनात प्रथमपासून उत्पन्न झालीच नाही ! अपवाद दुर्गाबाईंचे भाषण. ते झाले नसते तर समेलन पहिल्या दिवसापासून जे वाकलेले, गलितगात्र झालेले दिसत होते ते तसेच राहिले असते.

### तीन भूमिका

दुर्गाबाईंच्या भूमिकेचाही थोडा पुनर्विचार व्हायला हवा. तशा एकूण तीन भूमिका समेलनात माडल्या गेल्या.'साहित्यिकानी स्वत:ला सर्वश्रेष्ठ मानू नये' ही उद्घाटक श्रीमती शशिकलाबाई काकोडकर याची भूमिका क्रमाक एक 'साहित्यिकानी राज्यकर्त्यांच्या प्रेमपाशात अडकू नये' ही दुर्गाबाईंची भूमिका क्रमाक दोन आणि दलिताच्या वेदना व्यक्त होणार नसतील तर सर्वांचाच आविष्कारस्वातत्र्याचा हक्क आम्ही हिरावून घेऊ, अध्यक्षाना भाषणही करू देणार नाही, ही भूमिका क्रमाक तीन. या तीनही भूमिकाचा, प्रेरणाचा गलबला या साहित्यसमेलनात उसळला. या सर्व प्रेरणाचा काही समन्वय साधला गेल्याशिवाय हा गलबला यापुढेही प्रसगोपात्त उसळतच राहणार आहे. यातील एकही भूमिका किंवा प्रेरणा सवश्रेष्ठ व निरपवाद आहे असे म्हणता येणार नाही. 'साहित्यिकानी स्वत.ला सर्वश्रेष्ठ मानू नये' हे खरेच आहे; पण साहित्यिकाचे समाजातील कार्य राज्यकर्त्याहून भिन्न आहे, यासाठी साहित्यिक शक्य तितका स्वतत्र व निरंकुश राहायला हवा हेही विसरता येणार नाही. मत्री समेलनाला उद्घाटक म्हणून नको ही दुर्गाबाईंची भूमिकाही फार ताणण्यात अर्थ नाही. पु. ल. देशपांडे यांनीही इचलकरंजीच्या अधिवेशनात अशी भूमिका घेतली होती. दृश्य काय दिसले ? साहित्यिक व्यासपीठावरून खाली यशवंतराव चव्हाण वसले होते तिथे

पष्ठ ३२ वर

# सप्रेम नमस्कार

◘ 'माणूस'च्या १९७७ च्या दिवाळी–अंकात श्री. विनय हर्डीकर यांनी आपल्या 'आम्ही आणि बदमाष काळ' या लेखात माझ्याबद्दल बरेच काही लिहिले आहे.

माझ्याविषयीची त्याची पहिली तीनच वाक्ये पाहिली तरी त्यांच्या या लिखाणाची जात कळून येईल. ती वाक्ये अशी : 'विद्यापीठाच्या वृत्तपत्रविभागात श्री. पाध्ये यांनी बोलावं अशी त्यांना विनती करण्यात आली. पुण्याचे इतर काही संस्थाचे लोक म्हणतात, 'परिणामाविषयी साशंकता वाटते' म्हणून पाध्यानी अनेक ठिकाणी बोलण्याचं टाळलच. तरीही वृत्तपत्रविद्येच्या मुलांच्या समोर त्यानी भाषण केल.'

आता वस्तुस्थिती अशी आहे की, पुणे विद्यापीठाच्या वृत्तपत्रविभागात मी गेली पाच–सहा वर्षे शिकवीत आहे. वर्षाला तीस-पस्तीस तास घेतो. तेव्हा तेथे मला मुद्दाम भाषण करण्यास बोलावण्याचा आणि इतर सस्थाची निमत्रणे नाकारीत असताना वृत्तविद्याविभागाच्या विद्यार्थ्यांसमोर भाषण करण्याचा प्रश्न उद्‌भवतोच कोठे ? याचा अर्थ असा की, ज्या गोष्टीबद्दल लिहायचं तिच्याबद्दल प्राथमिक जुजबी माहिती मिळविण्याची गरजही हर्डीकरांना वाटत नाही. तसेच, इतर कोणत्या सस्थाची, 'परिणामाबद्दल साशकता' निर्माण करणाऱ्या विषयावर बोलण्याची, कोणती निमंत्रणे मी नाकारली ते हर्डीकर सांगतील काय ?' इतर सस्थाचे लोक' असा मोघम उल्लेख हर्डीकर का करतात ? आणीबाणीच्या त्या काळात 'परिणामाविषयी साशंकता' निर्माण करणा-या विषयांवर माझे व्याख्यान ठेवण्यास कोणत्या सस्था उत्सुक होत्या ते तरी हर्डीकर सांगतील काय ? त्याचे कोणते प्रतिनिधी मला भेटले होते किंवा निमंत्रणाची कोणती पत्रे त्यांनी मला लिहिली होती हे हर्डीकर जाहीर करतील का ? याबद्दल प्राथमिक शका येण्याइतकी हर्डीकरांची बुद्धी बद्द असेल असे त्यांच्या लेखावरून वाटत नाही; पण ती शुद्ध नाही असे दिसते. नाही तर सत्य जाणून घेण्यासाठी ते मला भेटले असते. ते मला ओळखतात. माझा पत्ता त्यांना माहीत आहे. निदान मला फोन करता आला असता.

मला ओळखणारे जाणतात की, मी साधारणपणे 'व्याख्यानां'चे निमत्रण स्वीकारण्यास उत्सुक नसतो आणि वक्तृत्वाचे आवश्यक गुण मजपाशी नसल्याने मला व्याख्यानाची फारशी निमत्रणेही येत नाहीत. चर्चा–गप्पांत (विशेषतः साहित्यिक चर्चा–गप्पात) मी आवडीने भाग घेतो. आणीबाणी सुरू झाल्यावर लवकरच पुणे विद्यापीठाच्या राज्यशास्त्र-विभागाचे एका परिसंवादासाठी मला निमंत्रण आले. मी ते स्वीकारले. परिसंवादासाठी लोकशाहीत (इंदिरा गांधींना नापसंत असलेल्या) सत्याग्रहाचा पुरस्कार करणारा एक निबंध मी लिहिला. (कॉलेजच्या वर्गात आणि खाजगी परिसंवादातसुद्धा गुप्त पोलिसांचे प्रतिनिधी जाऊन बसत असे त्या वेळी ऐकू येई.) परिसवादाच्या चर्चेत बोलताना, आणीबाणी ही फार गंभीर गोष्ट आहे. ती पुकारण्याचा अधिकार फक्त राष्ट्रीय सरकारला असू शकतो; पण सध्याची आणीबाणी एका व्यक्तीच्या आणि पक्षाच्या हितार्थ पुकारलेली दिसते, अशा अर्थाचे प्रतिपादन मी केले. ता. २९ नोव्हेंबर १९७६ रोजी मुबई पत्रकारसंघाच्या एका समारभात मी 'शब्दशक्ती' या विषयावर बोललो. ता. ३०।११।७६ च्या 'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये या भाषणाचा काहीसा विस्तृत वृत्तांत आला आहे त्यावरून या भाषणाचा रोख काय होता याची कल्पना येईल.

हो, त्या काळात मी एका संस्थेचे निमंत्रण नाकारले ही गोष्ट मात्र खरी. ती सस्था मातब्बर होती, मला भरपूर प्रसिद्धी देणारी होती आणि माझ्या नकाराचा संबंध आणीबाणीशी होता. माझ्यावर एक 'स्पेशल फीचर' करण्याबद्दल टी. व्ही. च्या एका जबाबदार अधिकाऱ्याने मला विचारले; पण आणीबाणी जारी असेपर्यंत मी टी. व्ही. वर कार्यक्रम करू इच्छित नाही असे मी त्याला सांगितले.

वरील गोष्टी ध्यानात घेतल्या म्हणजे हर्डीकरांच्या लेखणीची कुळी ध्यानात येईल. पहिल्या तीनच ओळीत तिचे दर्शन घडते. प्राथमिक माहितीही गोळा करण्याची गरज त्यांना वाटत नाही. अशा बेजबाबदार लेखकाला उत्तर काय द्यायचे ?

१८।११।७७ आपला

**प्रभाकर पाध्ये**, पुणे

◘ 'माणूस'च्या लौकिकाला साजेसा सर्वांग सुंदर दिवाळी अंक आवडला. गेल्या वर्षीचा 'माणूस' 'आर डाक्यूमेंट' साठी परिचितांच्या घराघरातून फिरविला होता.

या वेळच्या 'माणूस' मधला विषय हर्डीकर याचा. 'आम्ही आणि बदमाष काळ' हा लेख आवडला. इतर मासिकांतून या 'बदमाष काळा'चं, कारागृहाच्या भिंतीआडचं वर्णन करणारी सगळी बडी नेतेमंडळीच होती. खरं तर एखाद्या स्थानबद्ध कार्यकर्त्यांचे अनुभव प्रसिद्ध करायला हवे होते–विनय हर्डीकरांचा लेख प्रसिद्ध करून 'माणूस'ने ही अपेक्षा पूर्ण केली-अभिनंदन !

असेच अनुभव आमच्याही वाट्याला आलेले असल्यामुळं कदाचित लेख आवडला असेल. सत्याग्रहपर्व सुरू झालं. 'सघ आणि विद्यार्थी परिषदे'च्या भूमिगत कार्यकर्त्यांनी बैठका घेऊन भूमिका समजाविली होती. आम्हीही सत्याग्रह करायचा ठरविलं. आमच्या पाचजणाच्या तुकडीनं कॉलेज-परिसरात आणीबाणीविरोधी घोषणा देऊन सत्याग्रह केला. पोलिसांनी पकडून स्टाफरूममध्ये बसविलं. समोर बसलेले ओळखीचे प्राध्यापक चटकन उठले अन् बाहेर निघून गेले !

हो. आम्ही ओळख दाखविली तर नसती आफत यायची ! वर्गातून राज्यशास्त्राच्या तासाला 'लोकशाही आणि व्यक्तिस्वातंत्र्यावर' व्याख्यान झोडणाऱ्या आमच्या

गुरुवर्यांनी (?) आमच्या विरोधी साक्षी नोंदविण्यात पुढाकार घेतला. गजाआड असताना भेटायला येणारा विरळाच !

सत्याग्रह करण्याच्या आदल्या दिवशी आम्ही सापडत नव्हतो म्हणून घरात ठाण मांडून बसलेला पोलीस, अर्ध्या अर्ध्या तासानं 'सापडले का?' म्हणून चौकशी करणारा फोन. आम्ही करणार असलेल्या कोणत्याही कृत्याची घरी खबरबात नसल्यानं या सगळ्याच प्रकारनं भाबावलेली घरची मंडळी आणि बंद दाराच्या फटीतून गमत (?) बघणारे आमचे शेजारी, कोर्टाची पायरी अन् पोलिसस्टेशनचं तोंड उभ्या जन्मात बघण्याची वेळ न आलेल्या आमच्या घरच्या मंडळींना मनस्ताप देणारा हा काळ–पण तेव्हाही चार धीराचे शब्द सांगणारे कुणी पुढं सरसावले नाहीत.

शिक्षा संपली. बाहेर आलो. पण सत्याग्रह केला म्हणून पाठीवर शाबासकीची थाप मारणारा कोणी भेटला नाही. सगळी परिचित मंडळी कोणाच्या लक्षात येणार नाही असं निसटत स्मित करून करायची

एक चांगल्या सुशिक्षित (?) बाई तर म्हणाल्या, 'पाचदहा जणांनी आवाज उठवून काय होणारये, चेन पाहिजे!' तुमच्या मुलाला पाठवता का विचारलं तर पटकन् कटल्या!

भूमिगत असलेले संघप्रचारक यायचे, इकडच्या तिकडच्या बातम्या पुरवायचे; पत्रक द्यायचे. सगळ्यांना हुरूप देऊन जायचे. गुप्त बैठका घेताना, रात्री–अपरात्री पोस्टर्स लावताना, पत्रकांनी भरलेल्या बॅगा दुसऱ्या गावाला नेऊन पोस्टाच्या पेटीत रिकाम्या करताना थ्रिल वाटायचं.

दुर्गाबाई भागवत आणीबाणीविरोधी भाषण करणार असं समजल्यावरून थेट मुंबई गाठली. दुर्गाबाईंनी होकार भरला संगमनेरसारख्या गावात 'विद्यार्थी परिषदे'च्या बॅनरखाली त्यांचा कार्यक्रम घडवून आणला.

निवडणूक आली– झाली – जनता पार्टीनं जिंकली. 'त्या बदमाष काळात' आपण बरं, आपला अभ्यास बरा, त्या राजकारणाच्या गटारगंगेत कशाला पडायचं असं म्हणणारा तथाकथित युवकनेता (?) 'विजय सभे'तून 'आमची छाती गोळ्या खायला सदैव पुढेच आहे–' असं म्हणत कडाडून टाळ्या घ्यायला लागला तेव्हा, 'सुळासाठी छाती पुढं केल्याशिवाय मुकुटासाठी मस्तक पुढं करता येत नाही', हे खरं की खोटं तेच कळेना. इथं तर छाती पुढं करायच्या वेळी यानं पाठ दाखवली होती आणि आता छाती पुढं काढून मुकुटासाठी मस्तक पुढं करीत होता.

सत्याग्रहासह सर्वच कार्यक्रमात आघाडीवर असलेल्या माझ्या मित्राच्या 'हे असं का?' या प्रश्नाला मी काय उत्तर देणार होतो?

जे अनुभवलं, जे वाटलं ते लिहिलं.–

१८।११।७७ विनय गुणे, संगमनेर





**लेखक : पु. ल. इनामदार । राजहंस प्रकाशन, पुणे । मूल्य : वीस रुपये**

# साहित्यसंमेलन

## काही मूलभूत प्रश्न

**वा. दा. रानडे**

पुण्यातील मराठी साहित्यसमेलनासंबंधी वृत्तपत्रात बरेच लिहिले गेले आहे; पण काही मूलभूत प्रश्नाचा पाहिजे तेवढा विचार झालेला आढळला नाही. पहिला महत्त्वाचा प्रश्न म्हणजे दुर्गाबाईंनी उपस्थित केलेला मंत्री व साहित्यिक यांच्या सबंधाचा. साहित्य-समेलनास स्वागताध्यक्ष किंवा उद्घाटक म्हणून मंत्री कशाला हवा ? सरकार अनुदान देते म्हणून मंत्र्यांना हे मान द्यावयाचे हा एक प्रकारे सरकारचा मिंधेपणाच आहे असे त्यांचे म्हणणे. साहित्यिकाना हा मिंधेपणा वाटू लागला आहे याबद्दल त्याना खत वाटते. दुर्गाबाईंनी उपस्थित केलेला प्रश्न केवळ मंत्री व साहित्यिक याच्या संबधाचा नसून व्यापक अर्थाने सरकार आणि बिन-सरकारी सार्वजनिक सस्था यांच्या सबंधाचा आहे. सरकारी मदत अशा संस्थाना हवी की नको ? संस्थाना सरकारकडून मिळेल तेवढी मदत हवीच असते. अशा मदतीबद्दल कृतज्ञता म्हणून मंत्र्याना बोलावले तर बिघडले कुठे ? असा युक्तिवाद केला जातो आणि समजा साहित्य-संमेलनाने मत्र्याना बोलावले नाही म्हणून इतर संस्था त्याना बोलावण्याचे थांबविणार आहेत का ? आणि मंत्र्यांच्या दृष्टीने विचार करावयाचा म्हणजे मंत्र्यांना कोणीच बोलावले नाही तर जनतासंपर्क त्यानी ठेवायचा कसा ? दुर्गाबाईंची मूळ भूमिका चुकीची आहे असे येथे सूचित करायचे नाही; पण त्यातून उपस्थित होणाऱ्या प्रश्नानाही योग्य उत्तरे शोधली पाहिजेत.

अनुदानाच्या आशेने किंवा अपेक्षेने आपणास बोलावले जाते तेव्हा अनुदान आणि अशी निमंत्रणे याचा सबंध ठेवायचा नाही अशी आचारसंहिता वास्तविक मंत्र्यानीच का पाळू नये ? तीस वर्षांच्या कॉंग्रेस राजवटीतील प्रथा बदलून जनता सरकारने याबाबतीत नवा पायंडा का पाडू नये ? सार्वजनिक सस्थाच्या समारंभाची निमत्रणे आपणास वेळ असेल तेव्हा मत्र्यानी जरूर स्वीकारावीत; पण उद्घाटक किंवा मुख्य पाहुणे म्हणून जावयाचे नाही असा निश्चित सकेत त्यानी ठरवावा. मत्र्याना बोलावण्यावर संस्थेचे अनुदान अवलबून राहणार नाही. ते तिच्या कार्याच्या निकषावरच मिळेल असे धोरण सरकारने ठरवावे. तसेच मंत्र्याना व्यासपीठावरच स्थान द्यायला हवे ही प्रथाही बदलून इतर प्रमुख निमत्रितांच्याच बरोबरीने त्याना स्थान द्यावे.

अनुदान देताना सरकार पक्षपात करते, सत्तारूढ पक्षाचे पदाधिकारी ज्या संस्थावर आहेत त्याना झुकते माप दाखविले जाते, अशा तक्रारी केल्या जातात. अशा तक्रारीना जागा राहू नये यासाठी अनुदानाबाबतचा निर्णय मंत्र्याने स्वत: न घेता सर्व थराचे प्रतिनिधी असलेल्या बिनसरकारी समितीकडे सोपवावा. निरनिराळ्या संस्थांना अनुदानासाठी सरकार एकूण किती पैसा देऊ शकेल एवढेच फक्त सरकारने ठरवावे.

सस्थानी बोलावले नाही तर मंत्र्याना जनतासंपर्क साधता येणार नाही ही समजूत चुकीची आहे. संस्थानी मंत्र्याच्या मागे धाव न घेता मत्र्यानीच संस्थाकडे आपण होऊन आले पाहिजे. त्याच्या अडचणी समजून घेऊन त्या दूर करण्यासाठी उपाय योजले पाहिजेत. एखादी सस्था खरोखरच चांगले कार्य करीत असेल आणि तिला कार्यविस्तारासाठी पैसा कमी पडत असेल तर अधिक अनुदानाची तरतूद केली पाहिजे. तसेच सरकारी अनुदान घेऊन ते वेगळ्याच कारणासाठी खर्च करणाऱ्या सस्थाचे अनुदान त्यानी बंद केले पाहिजे. अशा रीतीने कार्य झाल्यास संस्थाचा कारभार सुधारेल. मंत्री आणि संस्था यांचे संबध सहकार्याचे राहतील आणि अनुदानासाठी मत्र्याचे मिंधे होण्याची वेळ संस्थावर येणार नाही.

युवक क्रांतीदल आणि दलित पँथर याच्या निदर्शनातून उपस्थित होणाऱ्या प्रश्नाचाही अधिक मूलगामी विचार करायला हवा. निदर्शनांमुळं झालेल्या गोंधळातून समेलन बद पडणे केव्हाही योग्य नव्हे. पुण्यातील समेलन हे शेवटचेच संमेलन ! असा गोंधळ होणार असेल तर समेलनाला निमंत्रण देण्याचे धैर्य कोण दाखवील ? अशी प्रतिक्रिया अनेकानी व्यक्त केली. एकदा गोंधळ झाला म्हणजे नेहमीच होईल असे मानण्याचे कारण नाही. गोंधळाच्या कारणांची आम्ही दखल घेतली आहे. पुण्यातल्या गोंधळामुळे साहित्यिकानी निराश होऊ नये. दरवर्षी समेलन होईलच आणि ते शांतपणे पार पाडण्यासाठी महामंडळ सर्व प्रकारची दक्षता घेईल असा दिलासा मंडळाने दुसऱ्याच दिवशी बैठक घेऊन द्यावयास हवा होता; पण झाल्या घटनांनी मंडळ एवढे भांबावले की त्याला मार्गच सुचेना !

समेलनाध्यक्ष पु. भा. भावे यानी 'मनोहर'ला दिलेल्या मुलाखतीत जी मते व्यक्त केली त्याच्या निषेधार्थ दलित पँथरचा मोर्चा कविसंमेलनाच्या वेळीच आला होता. 'मनोहर'ने छापलेली मुलाखत खोटी आहे. मी तसे बोललो नाही. मी सावरकरवादी आहे. मी जाती मानीत नाही अशा आशयाचा खुलासा भावे यानी केला. खुल्या अधिवेशनात तुमच्या प्रतिनिधींना बोलण्याची संधी दिली जाईल असे आश्वासन भावे यांनी दिले. मी अशी मुलाखत दिलीच नाही हा भावे याचा खुलासा खोटा आहे हे दाखविण्यासाठी आणि भावे याचा निषेध करण्यासाठी युक्रादने निदर्शन केले. माझी अध्यक्षपदी झालेली निवड ज्यांना पसंत नव्हती अशा लोकानी समेलन बंद पाडण्यासाठी निदर्शनाचा बचाव योजनापूर्वक घड-

वून आणला असा आरोप भावे यांनी केलेला आहे. भावे याची मतें तुम्हाला मान्य नसतील, मलाही मान्य नाहीत; पण ती मांडण्याचा त्यांना हक्क आहे. तुम्हालाही तुमचे म्हणणे मांडण्याची संधी दिलेली आहे असे सांगून निदर्शकाना शात करण्याचा प्रयत्न कुलगुरु दाभोळकर यानी केला. लोकशाहीच्या दृष्टीने त्यांची भूमिका बरोबर होती; पण अध्यक्ष भावे यांनी आपल्या जबाबदारीचे भान टेविले असते तर निदर्शनाचा प्रसंगच आला नसता. 'मनोहर'च्या मुलाखतीतील त्याची जातीयवादी मते वाचून दलितवर्ग खवळणे स्वाभाविक होते. भावे याच्या अध्यक्षीय भाषणातही दलितांच्या साहित्यासंबधी किंवा दलितांच्या प्रश्नांच्या साहित्यातील अभिव्यक्तीसंबंधी एका शब्दाने उल्लेख नाही. तेव्हा दलित समाजापासून दूर असलेल्या साहित्यिकाना आपल्या प्रश्नांची जाणीव करून द्यावी आणि समेलनात दलितांनाही मानाचे स्थान मिळाले पाहिजे हे आपल्याच विश्वात मशगुल असलेल्या उच्चभ्रू साहित्यिकांना निदर्शन करून पटवावे असे दलित पँथरच्या नेत्याना वाटले असेल तर त्याबद्दल त्यांना कितपत दोष देता येईल ?

आता पूर्वीच्या पद्धतीने साहित्यसमेलन भरवून चालणार नाही. साहित्यसंमेलन म्हणजे उच्चभ्रू साहित्यकाची मिरासदारी हे स्वरूप बदलायला हवे. साहित्यिकानी वास्तविक हे यापूर्वीच ओळखायला हवे होते. त्यांना जाग आणण्याचे काम पुण्याच्या समेलनातील निदर्शनांनी केले आहे समेलनात जे दोन परिसंवाद ठेवले होते त्यांचे विषयही दलिताच्या प्रश्नाना व त्याच्या साहित्याला स्पर्श करणारे नव्हते. दलित साहित्याची उपेक्षा यापुढे थाबली पाहिजे. संमेलनात दलित साहित्यावर परिसवाद झाले पाहिजेत. एवढेच नव्हे तर साहित्यमहामंडळ, साहित्यपरिषद, निरनिराळ्या शहरातील साहित्यपरिषदांच्या शाखा यांच्या समित्यांवर दलिताना योग्य प्रतिनिधित्व मिळायला हवे. आमच्या साहित्यसंस्थात आणि समेलनात दलित साहित्यिकांचा किंवा साहित्यप्रेमीचा सहभाग जाणीवपूर्वक वाढणार असेल तरच पुण्याच्या साहित्यसमेलनापासून आमचे साहित्यिक काही धडा शिकले असे म्हणता येईल. काळाची पावले ओळखून साहित्यसंस्थानी आपली कार्यपद्धती, आपल्या समेलनाचे स्वरूप बदलले पाहिजे, दलितवर्गाची जाणीव ठेवली पाहिजे, त्याचा सहभाग वाढविला पाहिजे, साहित्याच्या कक्षा वाढत आहेत, साहित्यसंस्थानीही त्यानुसार बदलले पाहिजे. काळाचे हे आव्हान आमचे साहित्यिक कितपत स्वीकारतात हे आता पाहावयाचे. □


चवदार तळे सत्याग्रह, मनुस्मृतिदहन या घटनांची सविस्तर माहिती

**महाडचा मुक्तिसंग्राम**

लेखक

**प्रा. रा. म. बिवलकर । प्रा. झुंबरलाल कांबळे**

किंमत वीस रुपये

**प्रस्तावना : प्रा. नरहर कुरुंदकर**

**पुरस्कार : श्री. भय्यासाहेब आंबेडकर**

राजहंस प्रकाशन । १०२५ सदाशिव पेठ । नागनाथ पाराजवळ । पुणे ३०

[टॉलस्टॉय पुस्तक योजनेतील ग्राहकांनी वरील पुस्तक व 'आर् डॉक्युमेंट' ही कादंबरी कार्यालयातून घेऊन जावी.]

चक्रमूचक्री (२६)

दीर्घस्मृति विश्वनाथ

# रूटस्

गॅम्बिया नदीच्या तीरावरचे ते एक खेडे होते. कडब्याच्या वर्तुळाकार भिंतीवर नसराळयासारखी छपरे ठेवलेल्या ६०–७० झोपड्यांतून शभर–सव्वाशे माणसे रहात होती. काळी कुळकुळीत आणि उघडीवाघडी. एरवी आळसावलेल्या व जांभया देणाऱ्या त्या वस्तीत आता मात्र बरीच खळबळ उडालेली दिसत होती. नदीच्या किनाऱ्यावर एक लॉंच उभी होती तिच्यातून उतरलेला, नखशिखान्त पाश्चात्य पोषाखात बुडालेला, पिंगट रंगाचा आणि कुरळ्या केसांचा एक माणूस त्या खेडवळांच्या गराड्यात उभा होता आणि आपापली लहान मुले त्याच्या कडेवर देण्याचा प्रयत्न ती गॅम्बियन माणसे करीत होती. तो परदेशी माणूस आपल्या रक्ताचा आणि जवळच्या नात्याचा आहे, हे त्यातून दाखविले जात होते. साता समुद्रापलीकडे विज्ञानाच्या चमत्कारानी भरलेल्या अमेरिकेत ज्याच्या सात पिढ्या गेल्या होत्या असा ॲलेक्स हेली आपल्या आफ्रिकन बांधवांना आज भेटत होता. ॲटलांटिक महासागराच्या पैलथडीला फोफावलेल्या वंशवृक्षाची एक पारंबी गॅम्बिया नदीच्या तटावर खोल रुतलेल्या आपल्या मुळाना आज कवेत घेत होती.

आज एकत्र येणाऱ्या मुळांच्या आणि पारंब्यांच्या दरम्यान पसरलेल्या वंशवृक्षाची कथा म्हणजे मनुष्याच्या पराधीनतेचे, हालअपेष्टांचे, अत्याचारांचे, सहनशीलतेचे आणि दुर्दम्य स्वातंत्र्येच्छेचे महाभारत आहे; दोनशे वर्षांच्या कालखंडाच्या विविध टप्प्यांवर जमलेल्या मनुष्यांच्या मेळाव्यांची चित्रकथा आहे; दैनंदिन जीवनात रमलेल्या, येणाऱ्या लहान-मोठ्या प्रश्नाना जमेल तशी उत्तरे शोधणाऱ्या, किंवा उत्तरे न शोधता, होईल ते सोशीत क्रमणा करणाऱ्या, एका कुटुंबाची ती जीवन-यात्राही आहे. कसेही पाहिले तरी ॲलेक्स हेलीने लिहिलेली स्वतःची 'रूटस्' ही कुळकथा वाचणे हा एक समृद्ध अनुभव आहे.

### कॅम्बी बोलोंगो

कॅम्बी बोलोंगोच्या (म्हणजे सध्याची गॅम्बिया नदी) काठावर मांडिका जमातीचे ज्युफुर नावाचे खेडे कधीपासून वसले होते कोण जाणे; पण एकदा त्या गावावर मोठे संकट कोसळले. पाऊस अजिबात पडला नाही. त्यामुळे गाव उठून जाण्याची पाळी आली. अशा वेळी एक फकीर त्या गावात आला आणि त्याने सतत अल्लाची करुणा भाकली. ईश्वर प्रसन्न झाला आणि त्या देवाच्या देणगीने धरती समृद्ध झाली. गावाने त्या फकिराचे माहात्म्य ओळखले आणि 'आता इथेच रहा!' अशी त्याची आळवणी केली. फकीरमहाशय ऊर्फ करिबा कुंटा किंटे यांनीही ती मानली; कारण गावातली एक सुदृढ आणि सुडौल तरुणी येसा हिच्याकडे त्याची नजर पावसासाठी हरीची प्रार्थना करतानाच गेली होती.

यथाकाल यैसाला आमोरु नावाचा मुलगा झाला. करिबा कुंटा किंटे याला आधीच्या बायकोचे दोन मुलगे होतेच; पण ते फिरस्ते असत. अमोरु मात्र ज्युफुरलाच राहिला. तो तीस–बत्तीस वर्षांचा झाल्यावर त्याने बिन्टा नावाच्या बाईशी लग्न केले. त्याचा पहिला मुलगा म्हणजेच कुटा किंटे. (किंटे हे टोळीचे नाव किंवा कुटुबाचे नाव.) हा जन्मला तेव्हा साल असावे १७५०.

आफ्रिकेतल्या जमाती आपण समजतो त्या अर्थाने रानटी नव्हत्या. प्रत्येक माणसाचे आयुष्य कसे आखलेले असायचे. पहिली पाच वर्षे मूल आईजवळ रहायचे. सहाव्या पावसाळ्यापासून दहाव्या पावसाळ्यापर्यंत गुरे चारणे, लहान भावंडाना सांभाळणे, आई–बापांची लहान-मोठी कामे करणे अशी जबाबदारी त्याच्यावर सोपविण्यात येई. मुलगा दहा वर्षांचा झाला की, सहा महिनेपर्यंत त्याला खास शिक्षणासाठी गावाबाहेरच्या आश्रमात पाठवीत. गावातली त्या वयाची सारी मुले वृद्ध पतोजी आणि त्याच्या हाताखालचे दोन शिक्षक याच्याकडून लिहिणे–वाचणे, शिकार करणे, ताऱ्यावरून दिशा ओळखणे, इतिहास–भूगोल, शिष्टाचार इत्यादि विषयाचे शिक्षण घेत. त्याखेरीज कुस्ती, रात्री अंधारातून गच्च रानांतून हिंडणे, मारामाऱ्या करणे या गोष्टी शिकवून मुलाना निडर आणि भक्कम बनविण्यात येई.

कुटा किंटे या सगळ्या चाकोरीतून गेला. पौरुष–शिक्षण (मॅनहुड ट्रेनिंग) घेऊन तो परत आल्यानंतर गावाकडून त्याला एक जमिनीचा तुकडा मशागतीसाठी मिळाला. त्याचा बाप अमोरु याने त्याच्यासाठी स्वतंत्र झोपडीही बांधविली. गावात गस्त घालणे, निरोप पोचविणे अशी कामे कुटा करू लागला. गावच्या पंचायतीच्या सभाना तो हजर रहात असे. एकदा परगावच्या दोघा-तिघा मुलांबरोबर, स्वत:च्या धाकट्या भावाला घेऊन तो सोने शोधायलाही गेला होता. थोडक्यात, गावचा एक जबाबदार रहिवासी होण्याच्या बेतात तो होता.

अलीकडे ज्युफुर आणि त्याच्या घेऱ्यात येणाऱ्या गावासमोर एकच नवाच प्रश्न उभा होता. समुद्रापलीकडून मोठ्या नावातून येणारे तुबॉब एकट्या-दुकट्या माणसाला पळवून नेत होते. तुबॉबच्या तावडीत माणूस सापडला की तो आपल्या घरादाराला, कुटुंब-परिवाराला कायमचा मुकलाच! तुबॉब माणसाला पकडून कुठे नेत आणि काय करीत हे कुणालाच माहीत नव्हते. पूर्वी तर हे तुबॉब सबंध खेडीच्या खेडी पकडून नेत; पण हल्ली गॅम्बियाच्या राजाने तुबॉबच्या किल्ल्यावर हल्ला चढवून त्याला जरब बसविल्यानतर दरोड्यांच्या जागी ही वाटमारी चालू झाली होती.

सतरा वर्षांचा कुंटा रात्रीची गस्त घालीत असताना त्याच्या डोक्यात दोनच विचार होते. एक तुबॉबचा आणि दुसऱ्या दिवशी रानात जाऊन ढोलासाठी लाकूड आणण्याचा. लाकडासाठी दिवस उजाडताच जावे असे त्याने ठरविले. गस्तीची पाळी पहाटेला संपली आणि कुऱ्हाड घेऊन कुटा रानात गेला. रानात तो झाड तोडीत असताना पावलाखाली काटकी मोडल्याचा आवाज येताच तो सावध झाला. कोण्याही आफ्रिकनाच्या पायाखाली काडी मोडल्याचा आवाज येत नाही. मागे वळून पाहतो, तो त्याला

दोन-तीन तुबॉब आणि फितुरी आफ्रिकन दिसले. कुंटा सावध होता, पण थोडा उशीर 'झाला होता. तुबॉब आणि त्यांच साथीदार यांच्याशी झालेल्या झटापटीत कुंटा बेशुद्ध झाला.

## लॉर्ड लिगोनियेर

कुंटा शुद्धीवर आला तेव्हा तो समुद्राच्या किनाऱ्यावर पडला होता. त्याच्या हाता-पायात बेड्या घालून त्याला जखडून टाकण्यात आले होते. शुद्धीवर आल्यावर पुन्हा त्याला आणि त्याच्यासारख्याच इतराना बेदम मारहाण करण्यात आली. त्या मारहाणीने आलेल्या बेशुद्धीतून कुंटा जागा झाला तेव्हा एका अधाऱ्या खोलीतील फडताळाच्या एका कप्प्यात आपण पडलेले आहोत असे त्याला आढळून आले. त्याचे हात शेजारच्या दोघा जणाच्या हातांशी लोखडी साखळीने बांधून टाकण्यात आले होते. पायाचीही तीच स्थिती होती.

लघवी, शौच, ओकारी, निरनिराळ्या ठिकाणच्या जखमातून वाहणारे रक्त यांचा एकच चिखल हे सर्व गुलाम झोपले होते त्या फडताळाच्या फळ्यावर झाला होता. जहाजाच्या पोटात असलेली ती खोली बंद पेटीसारखी होती. प्रकाश यायला दोन काचबद बुराखे होती. हवेचे अभिसरण कसे होई कोण जाणे. फडताळाच्या निरनिराळ्या मजल्यात मिळून सुमारे दीड-दोनशे जीव नाना आवाजात कण्हत-विव्हळत पडलेले होते.

दर दिवशी सध्याकाळी सर्वांना पेटीतून बाहेर काढून उघड्यावर नेण्यात येई. तेथे काळ्या गुलाम बायका गाणी गात व त्या तालावर पुरुष गुलाम हातां-पायांत बेड्या ठेवून नाचत. नाच संपला की सर्वांच्या जखमावर औषधी रोंगण लावण्यात येऊन पुन पेटीतल्या फडताळात कोडून ठेवण्यात येई. नाचासाठी वर जाताना, नाच चालू असताना आणि परत खाली येताना चाबकाने मारहाण होतच असे; पण नाचाचा एक फायदा होता, तो असा की, गुलाम स्त्रिया गाताना गाण्यातून बातम्या सांगत.

या गाण्यांतूनच कुंटाला कळले की, जहाजात तीस एक तुबॉब आहेत. त्यांनी सर्व गुलाम स्त्रियांवर बलात्कार केलेले आहेत. ते सतत दारू पीत असतात. जहाज चालू लागल्याला अमुक इतके दिवस झालेले आहेत वगैरे. त्याचप्रमाणे फडताळातल्या पुरुष गुलामानीही आपआपसात गुणगुणून, शेजारच्याच्या कानात पुटपुटून या टोकापासून त्या टोकापर्यंत निरोप पोचण्वाची व्यवस्था केली होती. जहाजावर बड करावे, नाच चालू असताना तुबॉबवर हल्ला करून त्यांना मारून टाकावे वगैरे बेत निरोपा-निरोपीतून ठरत.

पण हा कट शिजून पक्का होण्यापूर्वीच एका गुलामाने तुबॉबवर हल्ला केला. त्याबरोबर त्या गुलामाला तर गोळी घालून ठार करण्यात आलेच; पण इतराना इतकी जबरदस्त मारहाण करण्यात आली की त्या धक्क्यातून कटवाले सावरलेच नाहीत! तितक्यातच अमाशाची साथही सुरू झाली· रोजी एक-दोन गुलाम मरू लागले. दोन महिन्यांनी जहाज अमेरिकेला आले त्या वेळी मूळच्या १४० गुलामांपैकी फक्त ९८ जिवंत होते.

२९ सप्टेंबर १७६७ या दिवशी लॉर्ड लिगोनियेर हे जहाज ॲनापलिस या अमेरिकन बदराला लागले. त्यावरचा सगळ्यात उत्तम 'माल' होता गुलामाचा. त्यानंतर दोन-चार दिवसातच जॉन वॉलर या जमीनदाराने कुंटाला ७५० डॉलर्सला विकत घेतले. त्याचे नाव ठेवले 'टोबी!'

## स्पॉट्सिल्व्हानिया कौंटी—व्हर्जिनिया

जॉन वॉलरची कापसाची शेती होती. तेथे शेतकामासाठीच हा तरणाताठा गुलाम त्याने इतक्या डोईजड किमतीला घेतला होता; परंतु त्या कामात कुंटा रमला नाही. आपण स्वतंत्र व्हावे, पुन्हा आपल्या माणसात जावे, ते जमले नाही तर रानात रहावे असे त्याला वाटे. त्यामुळे तो चारदा पळाला; पण चारही वेळा शिकारी कुत्र्याच्या सहाय्याने त्याचा माग काढून त्याला पकडण्यात आले. चौथ्या वेळी त्याला पकडल्यानंतर त्याच्या पावलांचा पुढचा भागच कुऱ्हाडीने तोडून टाकला. त्यामुळे पळून जाण्याची आशाच खुटली!

कुंटाच्या तुटलेल्या पायावर औषधोपचार करी जॉनचा भाऊ डॉ. विल्यम. तो कनवाळू होता. त्याने जॉनकडून कुंटाला विकत घेतले आणि आपल्या घरी पहिल्यांदा बागकाम आणि नंतर बग्गीवाल्याचे काम अशी कामे दिली. पळून जाणे अशक्यच झाल्यामुळे म्हणा, किंवा कोणत्याही परिस्थितीशी जुळवून घेण्याची माणसाची वृत्तीच असल्यामुळे म्हणा कुंटा विल्यम वॉलरकडे रमला. त्याने विल्यमची स्वयंपाकीण बेल हिच्याशी लग्न केले. त्याला मुलगी झाली. तिचे नाव किझी.

विल्यम वॉलर कनवाळू माणूस होता. त्याच्या गुलामांना बरेच स्वातंत्र्य होते. तो त्यांच्या खाजगी बाबतीत ढवळाढवळ करीत नसे, तसेच कोण्या गुलामाला कधी विकतही नसे; पण आपण असे वागतो तेव्हा आपल्या गुलामांनी इमानदारीने वागावे, पळून जाऊ नये, अशी त्याची अपेक्षा असे. पळून जाणाऱ्या आणि पळून जाणाऱ्याला मदत करणाऱ्या गुलामाला तो तात्काळ विकून टाकी.

विल्यमची पुतणी ॲन हिच्याशी किझीची मैत्री होती. ॲनने किझीला लिहायला-वाचायला शिकविले होते. कुंटाला ते आवडत नसे. तो किझीला आफ्रिकेच्या गोष्टी सांगे. आपले खरे नाव कुंटा किंटा आहे, मुळात आपण कॅम्बी बोलोगोच्या काठी राहात होतो, तेथे फिडलला को म्हणत, अशा हकीकती सांगे.

किझी १६-१७ वर्षांची झाल्यावर तिने नोहा नावाच्या विल्यमकडच्याच एका गुलामाशी लग्न ठरविले; परंतु नोहाने ठरविले होते की, आपण उत्तरेकडे पळून जाऊन स्वतंत्र व्हायचे, पैसे जमवून किझीला सोडवायचे आणि मग लग्न करायचे. गुलामांना तिकडे बाहेर भटकता येत नसे. मालकाचे शेत सोडून दुसरीकडे जायचे तर मालकाने लिहिलेले दस्तकपत्र लागे. असे खोटे दस्तक किझीने नोहाला करून दिले आणि नोहा पळाला; पण दुर्दैवाने त्याला पकडण्यात आले आणि त्याने किझीची हकीकत सागितली. त्याबरोबर विल्यम वॉलरने किझीला विकून टाकले.

## कॅसवेल कौंटी—व्हर्जिनिया

किझीच्या नव्या मालकाचे नाव होते टॉम ली. तो विल्यम वॉलरसारखा घरदाज आणि कनवाळू नव्हता. हलक्या कुळातला, दारुड्या आणि जुगारी होता. किझीला

विकत घेतल्यावर लगेचच त्याने तिच्यावर बलात्कार केला त्या संबंधातून किझीला जो मुलगा झाला त्याचे नाव जॉर्ज. जॉर्ज चलाख आणि हिकमती होता. टॉम ली झुजीचे कोबडे तयार करी. रानकोंबडे पकडून आणायचे आणि त्यांना झुंज शिकवायची असा त्याचा धदा होता. जॉर्ज स्वत:ही कोंबडयाना शिकविण्यात तरबेज झाला. टॉम लीचे कोबडे झुज जिंकू लागले.

जॉर्जने मॅटिल्डा नावाच्या गुलाम मुलीशी लग्न केले. त्याला सहा मुले आणि दोन मुली होत्या. यापैकी एकाचे नाव त्याने टॉम ठेवले. हा मुलगा लोहारकामात निष्णात होता. स्वत चा संसार वाढत असताना आणि कोंबडे तयार करण्यात रमलेला असतानाही जॉर्ज आपली गुलामी विसरू शकला नाही. आपण आणि आपले कुटुब स्वतंत्र व्हावे यासाठी तो पैसे जमा करीत होता. तसे त्याचे दोन हजार डॉलर्स जमलेही होते. अशा वेळी एक अनोखी संधी चालून आली.

इंग्लंडहून सर एरिक रसेल नावाचा श्रीमत इंग्रज आपले कोबडे घेऊन आला होता. त्याच्या कोबडयाशी टॉम लीचे कोबडे झुजवायचे असे ठरले. टॉम लीने स्वत:चा सगळा पैसा आणि जॉर्जचे पैसे स्वत:च्या कोंबडयांवर लावले सगळे मिळून वीस हजार डॉलर्स होते पहिल्या झुंजीत जॉर्जने शिकविलेल्या कोबडयाने झुज जिंकली. चाळीस हजार झाले रसेलने टॉम लीला हुलीवर घालून ते सर्व पैसे दुसऱ्या झुजीवर लावायला लावले. या झुजीत टॉम लीचा कोबडा झुंज हरला ! आकाश कोसळले !

रसेलने टॉमला गळ घातली की, 'तुझा निग्रो नोकर माझ्या कोवडयाना शिकविण्यासाठी मला दे. मी तुला पैजेचे पैसे माफ करतो !' टॉमला दुसरा मार्गच नव्हता. त्याने जॉर्जला सागितले की, 'तू दोन वर्षांसाठी रसेलबरोबर जा. तिथून परत आलास की मी तुला सोडवून घेईन ! बघ, तुझं सोडवणकपत्रक मी सही करून ठेवलं आहे !' जॉर्ज रसेलबरोबर इंग्लंडला गेला तेव्हा साल होते १८५६.

## अॅलामान्स कौंटी–नॉर्थ कॅरोलिना

पण टॉम लीची स्थिती खालावतच गेली. तेव्हा त्याने जॉर्जचे सहा मुलगे आणि दोन मुली या सर्वांना मरे नावाच्या तंबाखूच्या जमीनदाराला विकले. मरेही घरंदाज आणि कनवाळू माणूस होता त्याने या सर्वांना चागले सांभाळले. लोहारकाम करणाऱ्या टॉमला त्याने लोहारकीचे दुकान थाटून दिले. त्याच्या शेतावर जुलमी ओव्हरसिअर नव्हते.

मरेकडे गुलाम म्हणून हे कुटुब असतानाच अमेरिकेतील यादवी युद्ध झाले; पण अॅलामान्स कौटीला या युद्धाची फारशी झळ पोचली नाही. युद्ध संपून दक्षिणी संस्थानानी शरणागती पत्करल्यावर मरेने सगळयांना स्वतंत्र केले; पण आपल्याजवळच ठेवून घेण्याची तयारी दाखविली.

पण यापूर्वीच रसेलबरोबर इंग्लंडला गेलेला जॉर्ज परत येऊन स्वतंत्र झाला होता. त्याने टेनेसी प्रातात चागली जमीन पाहून ठेवली होती. तो नॉर्थ कॅरोलिनाला आला आणि सर्वांना घेऊन टेनेसीला गेला.

टेनेसीला सर्व कुटुब चांगलेच भरभराटीला आले. टॉमची लोहारकी उत्तम चालली. त्याने एक वाण–सामानाचे दुकानही काढले शेतीही होतीच. सर्व भावानी मिळून चर्च आणि शाळाही काढली. त्यात टॉमच्या पाच मुली आणि मुलगे शिकले सिथिया नावाच्या मुलीने पामर नावाच्या लाकडाच्या वखारवाल्याशी लग्न केले. हा पामरही चागला श्रीमत झाला. पामरची मुलगी बर्था ही निग्रो घराण्यातली पहिली सुशिक्षित मुलगी. तिने १९१९ मध्ये सायमन हेली या शेतकी पदवीधराशी लग्न केले. तिचा पहिला मुलगा म्हणजे या पुस्तकाचा लेखक अॅलेक्स हेली.

## पुस्तकाची जन्मकथा

कुंटा किंटेच्या घराण्यात जन्माला आलेल्या प्रत्येक मुलाला तीन गोष्टी शिकविण्यात येत. एक, मूळ पुरुषाचे नाव कुटा किंटे असे होते. दोन, तो मुळात कॅम्बी बोलोंगो नावाच्या नदीच्या काठी राहात असे आणि तीन, तेथे फिडलसारख्या वाद्याला को म्हणत. ही सर्व हकीकत अॅलेक्सला माहीत होती.

दुसऱ्या महायुद्धात जहाजावर काम करीत असताना असे पुस्तक लिहावे अशी कल्पना हेलीच्या मनात आली. त्याने आपल्या नात्यातल्या जिवंत असणाऱ्या सर्व जणांना पत्रे लिहून शक्य ती माहिती गोळा केली. नतर हे काम मागे पडले. १९६५ मध्ये तो पुन: हिरीरीने या पुस्तकाच्या मागे लागला. वॉशिंग्टन, न्यूयॉर्क, लडन इथल्या ग्रथालयातून त्याने माहिती गोळा केली. जुनी दप्तरे तपासली. शिरगणत्याचे अहवाल चाळले. विद्यापीठांतील प्राध्यापकाशी चर्चा केल्या.

शेवटी तो गॅम्बियात पोचला. तेथे त्याची फोफाना नावाच्या एका गोधळयाशी गाठ घालून देण्यात आली. हे गोधळी लोक निरनिराळया टोळयाच्या हकीकती पाठ म्हणून दाखवितात. फोफानाने किंटे टोळीची हकीकत म्हणून दाखविताना कुटा किंटेचा उल्लेख करून सागितले की, 'कुटा लाकूड तोडण्यासाठी रानात गेला असता नाहीसा झाला!' त्यानतर हेलीने गॅम्बियातील फोर्ट जेम्समध्ये आल्या–गेल्या जहाजाच्या नोंदी मिळविल्या. टोबीला जॉन वॉलरने विल्यमला विकल्याचे खरेदीखत मिळविले आणि या पुस्तकाचा सागाडा तयार केला

'रूट्स्' हे अप्रतिम पुस्तक आहे; पण त्याला 'थोर' पुस्तक म्हणता येईल असे वाटत नाही कारण थोरपणाला जे तत्त्वचिंतन लागते त्याची जोड या पुस्तकाला नाही. तथापि, एका कुटुबाची ही ससार–यात्रा नाना तपशिलांनी परिपूर्ण असल्याने मनात घर करून राहाते एवढे मात्र खरे. □

आर्थिक टिपणे :

# ▫ टायनी सेक्टर ▫ रेल्वे अपघात

नारायण वैद्य, माजी उपमहापौर, पुणे

'टायनी सेक्टर' हा एक नवा शब्द कारखान्यांच्या बाबतीत रूढ होतो आहे. या शब्दाची नेमकी व्याख्या अजून तयार व्हावयाची असली तरी ज्या कारखान्यामध्ये यंत्रसामुग्रीसह गुतवणूक १ लाख रुपयांपर्यंत असेल, त्या कारखान्याचा समावेश 'टायनी सेक्टर'मध्ये केला जाईल असे दिसते. अशा तऱ्हेच्या लहान उद्योगाचा विकासकार्यक्रम आखण्याचे काम चालू आहे व त्या योजनाचा फायदा 'टायनी सेक्टर'-मधील कारखान्याना मिळेल असे सांगितले जात आहे.

देशातले सर्व कारखाने व तत्सम उद्योग याची गणना नुकतीच झाली. त्यात असे आढळले की, यत्रसामुग्री (मशिनरी) आणि इतर साहाय्यभूत साधने (इक्विपमेंट) यांची गुतवणूक १ लाखापेक्षा कमी आहे असे अगदी लहान कारखाने एकूण लघु-उद्योगाच्या ९०% आहेत. गेल्या काही वर्षांत लघु-उद्योगाची संख्या बरीच वाढलेली दिसते. या आकडेवारीचा विचार करताना 'स्मॉल-स्कल इंडस्ट्रीज' व 'टायनी सेक्टर' असा भेद आतापर्यंत करण्यात आलेला नव्हता. या अनुरोधाने १९७२ साली देशातल्या लघु-उद्योगाची संख्या १ लक्ष ४० हजार होती, ती १९७५ मध्ये ५ लक्ष ३० हजार झाली, परंतु गुतवणूक मात्र चौपटीने वाढली नाही. ती १९७२ मध्ये १०५४ कोटी रुपये होती, ती १९७५ मध्ये १५०० कोटी रुपयापर्यंत गेली आणि उत्पादन आणि रोजगार याबाबतीत दुप्पट प्रगती झाली. या आकडेवारीवरून एक चांगला निष्कर्ष निघतो (आणि तो वस्तु स्थितीनिदर्शक आहे) तो असा की, कमी गुतवणूक असलेले अधिक लघु-उद्योग निघाले तर रोजगार—भांडवलाचे गुणोत्तर या लघु-उद्योगामध्ये वाढते. इतकेच नव्हे तर उत्पादन-भाडवल हेही गुणोत्तर वाढते. या सर्वांचा अभ्यास करणारी तज्ज्ञ मंडळी असे सागतात की, नोकरीची किंवा रोजगाराची एक जागा निर्माण करण्यास, लघु-उद्योगात ५ हजार रुपये पुरतात; परतु अवजड-उद्योगात ३० हजार रुपये लागतात. तेव्हा १० वर्षांत बेकारी निर्मूलनाची जी योजना सरकारच्या विचाराधीन असेल, त्यामध्ये आता 'टायनी सेक्टर'ची भूमिका महत्त्वाची ठरेल म्हणून १० लाख लोकाना वर्षाला नवा रोजगार उत्पन्न करून द्यावयाचा असेल तर 'टायनी सेक्टर'साठी वर्षाला ५०० कोटी रुपयाची गुतवणूक होईल असे पाहिले पाहिजे.

'टायनी सेक्टर'ची रोजगार पुरविण्याची व त्याबरोबर उत्पादन वाढविण्याची खरोखरीच अशी क्षमता असेल तर याबाबतीत सरकारने १० वर्षे मुदतीची खास योजना आखली पाहिजे. लघु उद्योगासाठी म्हणून जी रक्कम राखून ठेवण्यात येते ती त्याना कर्ज म्हणून देताना परतफेडीची क्षमता असलेल्या उद्योगांनाच देण्यात येते. परिणामी जे लघु उद्योग चांगले फायद्यात चालतात त्यानाच जादा भाडवलाचा फायदा मिळतो. ज्या लघु उद्योगाना भाडवलाची आत्यतिक गरज आहे त्याच्याकडे आपोआप दुर्लक्ष होते. त्या दृष्टीने 'टायनी सेक्टर'मध्ये १ लाखापर्यंतची गुतवणूक असणाऱ्या कारखान्यांचा समावेश केला जात आहे, हे अतिशय योग्य आहे.

एका मोठ्या उद्योगाच्या भोवती लहान उद्योग पसरलेले असतात आणि ते सुद्धा शहरी भागात. अशा ठिकाणी सभोवतालच्या लघु उद्योगांचे जीवन सर्वस्वी मोठ्या उद्योगांवर अवलंबून असते, म्हणजे हे सारे लघु उद्योग परावलबी असतात. म्हणून 'टायनी सेक्टर'चा विकास करताना त्याची उत्पादने, वितरण आणि खप याबाबतीत मोठ्या उद्योगांशी त्यांचा संपर्क कमीत कमी राहील असे पाहिले पाहिजे. जीवनावश्यक वस्तूचे उत्पादन या 'टायनी सेक्टर'कडे सोपविले आणि त्या वस्तूचे उत्पादन करण्यास मोठ्या कारखान्याना बंदी केली तर अनेक प्रकारचे फायदे होतील. पहिला फायदा म्हणजे, गुतवणूक कमी व निर्मितीचा खर्च कमी. त्यामुळे स्वस्त माल तयार होईल दुसरा फायदा म्हणजे, तयार होणारा माल (अवजड कारखान्याच्या मानाने) अगदी कमी प्रमाणात तयार होत राहील आणि तो आसपासच्या भागात लगोलग खपला गेल्यामुळे भाडवलाची वसुली लवकर होत राहील. दूरच्या वाहतूकीचा खर्च वाचेल. त्यामुळे मालाची किंमत कमी राहील व एकच वस्तू उत्पादन करण्याचे शेकडो लहान लहान कारखाने देशाच्या विविध भागात तयार होतील.

'टायनी सेक्टर'च्या बाबतीत सरकारने एक निश्चित भूमिका घ्यावी. ती अशी की, केवळ १ लाखापर्यंतची गुतवणूक असेल तर त्याचा समावेश 'टायनी सेक्टर'मध्ये झाला, असे करू नये. हा लघु उद्योग ग्रामीण भागात असला पाहिजे, त्याने तेथील नैसर्गिक साधनसंपत्तीचा वापर केला पाहिजे, त्यातून तयार होणारे टाकाऊ पदार्थ उपयुक्त कसे होतील हे पाहिले पाहिजे, शेतीसाठी त्या कारखान्याचा जरी प्रत्यक्ष नाही तरी अप्रत्यक्ष कसा उपयोग होईल हेही पाहिले पाहिजे. या 'टायनी सेक्टर'मध्ये जो माल तयार होईल त्याच्या वितरणाची व दर्जा चागला राहील याची काळजी सुरुवातीला सरकारने घ्यावयास हवी, म्हणजेच ६ व्या पंचवार्षिक योजनेच्या कालखंडात 'टायनी सेक्टर'चे बाबतीत जे यश सरकार अपेक्षिते ते पदरात पडेल. ६ व्या पचवार्षिक योजनेच्या अखेरच्या वर्षात लघु-उद्योग क्षेत्रातून २७,००० कोटी रुपयाचा माल तयार होईल असे गृहीत धरले जात आहे. याचा अर्थ असा की, प्रतिवार्षिक जादा रोजगार उपलब्धतेची (प्रोजेक्शन इन् एक्स्ट्रा एम्प्लॉयमेंट जनरेशन) जी कल्पना ६ व्या पंचवार्षिक योजनेत गृहीत धरली आहे, त्यापेक्षा ३० लक्ष अधिक रोजगार या ५ वर्षांत उपलब्ध केले जातील. हे साध्य होण्यासाठी एकूण २,२०० कोटी रुपये भाडवल गुतवणूक करावी लागेल.

यातील २०% रक्कम उद्योजकांना घालावी लागेल व ६ व्या पंचवार्षिक योजनेच्या शेवटच्या वर्षात ५,३०० कोटी रुपये खेळते भाडवल लागेल, असे सांगितले जात आहे.

या 'टायनी सेक्टर' मधील लघुउद्योगाची चागल्या प्रकारे भरभराट व्हावी म्हणून ग्रामीण भागात छोटया औद्योगिक वसाहती तयार करणे, मागासलेल्या विभागात– विशेषत: ईशान्य भारत, उत्तर बिहार व उत्तर प्रदेशाचा पूर्व भाग येथे–औद्योगिक सोयी करण्यासाठी खास निधी उभारणे व स्थानिक कच्च्या मालाची आतर-जिल्हा ने-आणीला बदी घालणे यासारखे अनेक उपाय सरकारच्या विचाराधीन आहेत; परंतु या बाबतीतले सर्व निर्णय सरकारने भावनेच्या आहारी जाऊन घाई–गर्दीने न घेता विचार-पूर्वक घ्यावेत. अशा दृष्टीने की, त्यात एक-सारखा बदल करावा लागू नये, असे सुचवा-वेसे वाटते. ◻

## असुरक्षित प्रवास

दिल्लीकडे जाणाऱ्या अहमदाबाद मेलला हरियाणामध्ये रेवाडीजवळ मोठा अपघात झाला. त्यात २० लोक ठार झाले. त्यामध्ये अनुभवी आणि ज्येष्ठ संसदसदस्य श्री. प्रकाशवीर शास्त्री याचा समावेश आहे. हा घातपाताचा प्रकार आहे हे खुद्द रेल्वेमंत्र्या-नीच सांगितल्यामुळे सर्वांनाच मोठा धक्का बसला. एका महिन्यात संशयित घातपाता-मुळे धावत्या गाडीला अपघात होण्याचे हे तिसरे गंभीर प्रकरण आहे. काही दिवसापूर्वी तेजपूर एक्सप्रेसला भयानक अपघात होऊन ८६ लोक ठार झाले. त्यावर भाष्य करताना रेल्वेमंत्री म्हणाले होते, 'ही श्रीची इच्छा!' परंतु उत्तर रेल्वेच्या परिसरात २० ऑगस्ट व १० ऑक्टोबर हे दोन फारच मोठे अप-घात झाले. १० ऑक्टोबरचा अपघात हा असाच भयानक होता. त्या दिवशी हौरा–दिल्ली डी लक्स एक्सप्रेसला नैनीजवळ अप-घात होऊन ५७ प्रवासी मेले आणि शेंकडो जखमी झाले. काही गंभीर रेल्वे–अपघातात ठार होणाऱ्यांची सख्या इतकी वाढली आहे की, एखाद्या लहान अपघातात जर १–२ च माणसे मेली तर त्याची दखल कोणी घेईनासे झाले आहे. मद्रास–न्यू दिल्ली ग्रँड ट्रंक एक्स-प्रेस मद्रास स्टेशनजवळच एका मालगाडीवर आदळली किंवा नोव्हेंबरच्या सुरुवातीला दिल्ली-जंक्शन स्टेशनमध्ये, एक बाहेर पड-णारी उतारू गाडी व दुसरी स्टेशनात येणारी गाडी यांची भर स्टेशनमध्ये टक्कर होऊन एकजण ठार झाला; पण माणसाच्या जीवनाची गती इतकी वेगवान झाली आहे की, असल्या किरकोळ अपघाताकडे लक्ष देण्यास त्याला वेळच नाही.

रेल्वेबोर्डाच्या सुरक्षितता सचालनालयाने प्रसिद्ध केलेल्या भारतीय रेल्वेमधील अप-घातांचे आकडेवारीत असे म्हटले आहे की, १९७४–७५ आणि १९७५–७६ मधील अपघातांचे प्रमाण वाढले आहे. रेल्वेमंत्री श्री. मधु दंडवते यांनी लोकसभेत नुकतेच सांगितले की, या वर्षी एप्रिल ते ऑक्टोबर या काळात ५१५ रेल्वेअपघात झाले. यापैकी २६३ अपघातांना रेल्वे-स्टाफ जबाबदार आहे.

परंतु सर्वसाधारण जनतेने मात्र या प्रवासाबाबत मोठाच धसका घेतलेला दिसतो. आतापर्यंत 'सर्वांत धोक्याचा प्रवास म्हणजे विमानाचा' असे लोक समजत होते. काही दिवसांनी सरकारला असा कायदा करावा लागेल की, 'जीवन-विमा उतरवल्याशिवाय रेल्वेमधून प्रवास करता येणार नाही.' प्रत्येक मृत प्रवाशाच्या वारसांना रेल्वे कित्येक हजार रुपये देते. शिवाय इंजिने, डबे, लोहमार्ग, पूल यांची होणारी मोडतोड कित्येक कोटीचे घरात जाते. वाहतुकीमध्ये अनेक तासांचा व्यत्यय आल्यामुळे होणारे नुकसान जरी मोजता येत नसले तरी ते होत नाही, असे म्हणता येणार नाही.

ही झाली आर्थिक बाजू! पण मानवी जीवांचे काय? सुरक्षित प्रवासाची हमी रेल्वे देणार आहे की नाही? सेवकांच्या हलगर्जी-पणामुळे किंवा चुकांमुळे ५१५ पैकी २६३ अपघात होणार असतील तर हे प्रमाण कमी करण्याच्या दृष्टीने रेल्वेमंत्र्यानी तातडीचे पाऊल उचलले पाहिजे. स्वत: रेल्वेमंत्र्यांनी एक गोष्ट मान्य केली आहे–आणि ती वस्तु-स्थितीला धरून आहे–की, विशेषत: आव-श्यक सेवाविभागातील रेल्वेकर्मचाऱ्यांवर कामाचा ताण फार पडतो. गेल्या काही वर्षांत कामाचा बोजा खूपच वाढलेला दिसतो. दर किलोमीटरमागे प्रवासी वाहतूक १९५०–५१ मध्ये ६६,५१७ होती ती १९७५–७६ मध्ये १,४८,९१६ झाली आणि याच काळात रेल्वेवाहतूक प्रति किलो-मीटरमागे ४४,११७ टनांवरून १,४८,२१९ टनांपर्यंत गेली. या वाहतुकीच्या ताणाबरोबर रेल्वेकर्मचाऱ्यांचे जीवनमान म्हणावे तितके सुधारले नाही. गेल्या महिन्यात चीफ सेफ्टी सुपरिंटेंडेंटस् यांच्यासमोर भाषण करताना रेल्वेमंत्री श्री. मधू दडवते यानी या कामाच्या ताणाचा उल्लेख केला. कामाचे तास १२ ऐवजी ८ करणे, ज्या ठिकाणी डोळयांत तेल घालून लक्ष ठेवावे लागते, अशा ठिकाणी कामाचे दररोजचे तास ६ पर्यंत कमी करणे, आठवडयाची सुट्टी प्रत्येकाला मिळेल हे पाहणे या गोष्टी जशा रेल्वेखात्याने केल्या पाहिजेत तसेच सुरक्षिततेचे नियम रेल्वेसेवकाकडून कोणत्याही परिस्थितीत उल्लंघिले जाणार नाहीत हेही कटाक्षाने पाहिले पाहिजे. बोनसबाबत सरकारने घेतलेले दुटप्पी धोरण, वेतनश्रेणीबाबतचा असमतोल व संपकाळात दुखावलेले कामगार या सर्व बाबींचा पुन-र्विचार अपघाताच्या कारणाच्या सशोधनाचे निमित्ताने व्हावा हे अधिक चांगले. ◻

# आनंदमार्ग आहे तरी काय ?

हल्ली रोज आनदमार्गी लोकाबद्दल काही तरी वाचनात येत असते; परतु आनंदमार्ग आहे तरी काय? या पंथाचे लोक आहेत तरी किती? वगैरे अनेक प्रश्न आपल्यासमोर उभे रहातात. काही इंग्रजी साप्ताहिके–मासिके यातून जी माहिती उपलब्ध झाली त्यावरून हा लेख मराठी वाचकांसाठी लिहिला आहे.

श्री. प्रभातरंजन सरकार यांनी या आनंदमार्गाची स्थापना १९५५ मध्ये केली. श्री. सरकार हे बिहारी बगाली. त्यांची भाषा भोजपुरी. हा पंथ स्थापण्यामागे मानवजीवनास मदत करणे, त्यातल्या त्यात सर्वसामान्य माणसास मदत करणे हे उद्देश आहेत. असे श्री. सरकार यांचे म्हणणे आहे; परतु हे सर्व समजण्यासाठी त्यांच्या काही घटना, पूर्वेतिहास पाहिला पाहिजे.

या सघटनेच्या बातम्या प्रथम १९६७ मध्ये बाहेर येऊ लागल्या. या संघटनेच्या पाच सबधिताना बिहार–बगालच्या सरहद्दीवर स्थानिक संथालाबरोबर मारण्यात आले. न्यायालयात या केसची चिरफाड करण्यात आली. त्याआधारे ही सघटना मानवजातीच्या कल्याणासाठी नाही, हे सिद्ध झाले व तिचे दहशतवादी स्वरूप उघडे पडले.

यज्ञात बळी गेलेल्या लोकांच्या हत्येमागे, अनेकांच्या खुनामागे व अनेकाना घाबरवून त्यांच्याकडून काही गोष्टी घडवून आणण्यापाठीमागे या आनंदमार्गीयांचा हात आहे, हे सिद्ध झाले आहे भारताचे मुख्य न्यायाधीश ए. एन्. रे याच्या खुनाचा प्रयत्न केल्याबद्दल नोव्हेंबर १९७६ मध्ये दोन अवधूताना सतरा वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा झाली आहे.

पाच अवधूत व एक आचार्य यांच्या हत्येमागे श्री. सरकार याचा हात आहे, असा निकाल २६ नोव्हेंबर ७६ ला ॲडि. सेशन्स जज्ज (पाटणा) श्री. राधावल्लभ सिंग यांनी दिला. त्या मृतानी संघटनेच्या अलिखित नियमांचा भग केला होता. आनदमार्गी हा एकदा संघटनेत आल्यावर त्यास मरेपर्यंत ती सघटना सोडता येत नाही.

ही केस सुनावणीस येण्यापूर्वी ५ वर्षे श्री. सरकारना अटक झाली होती. त्यांना आजन्म जन्मठेपेची शिक्षा देण्यात आली आहे.

या निकालाविरुद्ध अनेक ' मार्गीयां 'नी निषेध म्हणून स्वतःस जाळून घेतले होते. बऱ्याच ठिकाणी या सघटनेच्या समर्थकांनी पोलिसांशी सामना दिला होता. या बातम्या आणीबाणीतील सेन्सॉरशिपमुळे छापल्या गेल्या नव्हत्या.

एक एप्रिल १९७३ पासून श्री. सरकार यांनी जेलमध्ये उपोषण सुरू केले आहे. ते रोज फक्त एक कप ताक घेत आहेत. पुरोधा व अवधूत या पदावर असलेले सर्व सभासद या सघटनेच्या हालचालीवर नियंत्रण ठेवण्याचे काम करतात. यानंतरच्या ग्रेडस् आहेत आचार्य, तात्रिक व साधक.

आनंदमार्गीयांच्या ४५० शाळा व अनेक मोफत रुग्णालये देशात पसरली आहेत. मुबईतील एक अवधूत म्हणतो की, आमचे शिक्षण शिस्त, देशाभिमान व अध्यात्मवाद (प्रेतवाद) यावर जास्तीत जास्त भर देते.

सी. आय्. डी. च्या एका ऑफिसरने ही माहिती वरचा मुलामा दर्शवणारी असल्याचे सांगून आनंदमार्ग सर्वांसाठी खुला नसल्याचे स्पष्ट केले. त्यात तरुणांना, मुख्यत्वे त्यांच्या अशा वयात की, त्यांच्यावर आनदमार्गीयाचा ठसा उमटू शकेल व त्यात ते भारावून जातील, अशाच तरुणांना आनंदमार्गी विचारसरणीने प्रथम भारावून टाकण्यात येते. हा नाझी प्रकार होय.

मार्गीयाचे म्हणणे आहे की, आनंदमार्ग म्हणजे भाडवलशाही व साम्यवाद (Capitalism & Communism) या दोघानाही पर्यायी मार्ग होय. त्यास ते प्रोग्रेसिव्ह युटिलायझेशन थिअरी (Prout) असे म्हणतात. प्राउटिस्टाच्या मते व्यक्तिगत स्वातंत्र्य व सामूहिक हितसंबध या दोहोना एकत्रित आणण्यासाठी ही आधुनिक थिअरी उपयोगी पडू शकेल.

जे भोग माणसाच्या नशिबी आहेत ते भोगल्याशिवाय त्याची मुक्तता नाही यावर जोर देऊन पुढे ते म्हणतात की, आपला उत्कर्ष करण्यासाठी या अडाणी, अशिक्षित लोकाचे नागरिकत्वाचे हक्क हिसकावून घेतले पाहिजेत. जणू काही नाझी राजवट आणण्याचाच हा प्रकार होय. इथे एका गोष्टीकडे आपले लक्ष वेधले जाते. या आनंदमार्गीयांमध्ये बहुसंख्य श्रीमत व ज्यास खानदानी घराणी म्हणतात अशा घराण्यातील लोकांचाच समावेश आहे.

'पूर्वेकडील लोकांचे स्वत.चे तत्त्वज्ञान व पाश्चिमात्य राष्ट्राची पूर्वेकडील लोकांबद्दल असलेली दुय्यम वृत्ती ही दोन्हीही नाकारून उत्कर्षासाठी ते दुय्यमांच्या हालचाली कशा करता येतील याचे समर्थन करताना दिसतात. एकंदरीत त्यांची ही विचार करण्याची पद्धत समाजाच्या दृष्टीने भयानक आहे.

परदेशातील मार्गीचे अनेक समर्थक आनंदमार्ग म्हणजे 'बुद्धीझम' होय असे म्हणताना आढळतात. त्याचा नशिबावर हवाला आहे.

प्रामुख्याने प्राउटिझमशी एकनिष्ठ राहताना व अनाथामध्ये व घाणेरड्या वस्त्यामध्ये (झोपडपट्टी) काम करताना आनंदमार्गीयांना सांसारिक आयुष्य जवळजवळ नसतेच. प्रत्येक अवधूतास एका ठराविक काळात तत्र प्राप्त करावे लागते. या विधीसाठी दोन कवटचा व संपूर्णपणे एकातवास लागतो.

या कवटचा कुठून प्राप्त करता असे विचारले असता एक मार्गी उसळून तुच्छतेने म्हणाला, 'मेडिकल कॉलेज व दफनभूमीमधून आणतो; परंतु मी खात्रीने सांगतो की लोकाना मारून नव्हेत '

या कवटयामुळे मन एकाग्र होते व मानसिक ताकद मिळते. ऑगस्ट ७५ मध्ये घेतलेल्या झडतीबद्दल ज्या बातम्या बाहेर आल्या त्याबद्दल समर्थन करताना आनंदमार्गी म्हणतात,

१. त्या वेळच्या सरकारला आमच्यावर बंदी आणायची होती म्हणून त्यानीच ते नाटक रचले होते. २. झडतीत फक्त एक खजीर व काही पिस्तुले मिळाली होती. बातम्या भडक छापल्या होत्या.

वाईट गोष्टीशी सामना देण्यासाठी प्रत्येक अवधूताने एक खंजीर जवळ ठेवावाच लागतो.

१९ महिन्याच्या कारावासानंतर अनेक आनदमार्गी मुक्त झाल्यावर आता पुन्हा इस्पितळे व शाळा सुरू झाल्या आहेत. आनंदमार्गीचे अनेक परदेशी समर्थक पतप्रधान, गृहमत्री, जनता पक्ष अध्यक्ष वगैरेंजवळ श्री. सरकार याची शिफारस करीत आहेत. जामा मशिदीचे शाही इमाम देखील या कोरसमध्ये सामील झाले आहेत.

या खुनांशिवाय श्री. सरकार यांच्यावर लैंगिक अत्याचाराचे आरोप आहेत त्यांच्या पत्नी, ज्या त्यांना ऑक्टोबर १९७१ मध्ये सोडून गेल्या, त्यानी सागितले आहे की, श्री. सरकार हे धार्मिक विधीसाठी मुले आणीत व त्यांना तुम्ही मुली आहात असे भासवून त्याच्यावर अत्याचार करीत.

परंतु एवढे असूनही हा प्रश्न उभा राहतो की, एक माणूस जेलमधून जगभर २० लाख लोकांची संघटना कशी हाताळू शकतो? काहीच्या मते ह्या संघटनेचे केंद्रस्थान प. जर्मनीमध्ये असून सी. आय्. ए. प्रमाणेच ही एक गुप्तहेर संघटना आहे.

—पी. एम्. शिंदे



### आदिवासी उपयोजना

# कार्यक्षम नोकरवर्गाचा अभाव

रघुवीर मुळे

आदिवासी समाजाच्या सामाजिक, आर्थिक उत्कर्षासाठी त्यांना घटनेनेच संरक्षण देण्याला आज जवळ जवळ दोन तपांच्या वर कालावधी लोटलेला आहे. कायदेमंडळातील राखीव जागा, जमिनीच्या हस्तांतराबाबतचे विविध कायदे, सावकारी पाशातून त्यांची सुटका व्हावी म्हणून कर्जमुक्तीसारखी नियंत्रणे इत्यादी धोरणांची कास या समाजाच्या विकासासाठी शासनाने धरली आहे. आदिवासी विभागातला शेतीविकास बऱ्याच काळापासून दुर्लक्षित राहिलेला होता. किंबहुना 'डोंगर दऱ्यांत कुठली आलीय शेती ?' या विचाराने तिकडे पूर्णतः दुर्लक्षच झाले होते, ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. गेल्या दहा वर्षांच्या काळात मात्र शेतीविकासाच्या कार्यक्रमांतर्गत शेतीसाठी आवश्यक त्या साधनांचा पुरवठा करणे, शेतीला पूरक असे जे जोडधंदे आहेत त्यासाठी अनुदान देणे व जमेल तेवढा प्रगत समाजाशी त्यांचा संपर्क साधवून देणे याकडे लक्ष पुरविण्यात आले. या गोष्टी विशिष्ट कालावधीत साध्य व्हाव्यात यासाठी आदिवासी विकास गटांची निर्मिती करण्यात आली. यावर खर्च झालेला पैसा काही कोटींच्या घरात गेलेला असला तरी त्याचे नेमके फलित काय ? आदिवासी समाज आहे तेथेच आहे. अद्यापही विकासाची गंगा त्याच्या दारापर्यंत पोचू शकलेली नाही. ही अनुमाने विविध पातळीवरच्या सरकार-नियुक्त अभ्यास गटांनीच काढलेली आहेत.

केवळ नासिक जिल्ह्यातच पाहिले, जिल्ह्याच्या किंवा तालुक्याच्या ठिकाणावरून हाकेच्या अंतरावर असलेल्या आदिवासी परिसरात जर चक्कर टाकली तर आदिवासी विसाव्या शतकातही अश्मयुगीन वाटतो. पाड्या-वाड्यांवरचे छप्पर नावाचे घर, खायला कंदमुळे, गाडगी-मडकी हाच त्यांचा आजही संसार आहे. पोटासाठी तो जेव्हा जवळच्या मोठ्या गावात आसरा घेतो तेव्हाही पोटावारी राबणारा मजूर हीच त्याची भूमिका असते आणि एकूण दास्यत्व हा त्या समाजाचा स्थायीभाव तर नाही ना, असे वाटू लागते. घटनेने संरक्षण देऊनही गेल्या सत्तावीस वर्षांत तो आहे तेथेच आहे. आमचा आर्यभट्ट अवकाशात झेप घेता झाला, अणुयुगाची चाहूल आम्हाला लागली, दोन-तीन युद्धेही झाली. इथली लोकशाही जाते जाते म्हणता शांततामय क्रांतीने उजळूनही निघाली. मग अजूनही आदिवासींचे भवितव्य अंधाराच्या पारंब्यांवरच हिंदकळते आहे, हे कसे ? याचे नेमके उत्तर कोणते ?

या परिस्थितीची जी जी म्हणून प्रमुख कारणे आहेत त्यात दळणवळणाचा अभाव, शेतीच्या हंगामाव्यतिरिक्त उपजीविकेसाठी लागणारी अन्न व साधनांची गरज (खावटी), बेकायदेशीर सावकारी आणि त्यातून होणारी पिळवणूक—परंतु त्याशिवाय पर्यायही नाही अशी अवस्था, वनसंपत्ती गोळा करून ती व्यापाऱ्याला देऊन नित्य व जीवनोपयोगी वस्तू व्यापाऱ्यांकडून खरेदी करण्याची प्रवृत्ती, शिक्षण नाही म्हणून आजचा दिवस चांगला मानण्याचा स्वभाव व ह्यामुळेच अज्ञान, मागासलेपण, निराशेपोटी निर्माण झालेली अगतिकता, नैराश्य आणि आळस, निरनिराळ्या बोलीभाषांमुळे गटागटाने राहून एकसंघ कधीच न होण्याची निसर्गानेच निर्माण केलेली विचित्र अवस्था आणि त्यामुळेच समंजस व एकमुखी नेतृत्वाचा अभाव या कारणांचा समावेश होतो.

आदिवासी विभागात जागृती व्हावी, या दऱ्या-खोऱ्यातील माणसाला माणूस म्हणून जगण्याचे स्थान हक्काने प्राप्त व्हावे, यासाठी विदेशी मिशनऱ्यांबरोबरच भारतीय संस्कृतीचे जतन करणाऱ्या संस्था आणि अनेक समाजसेवकांनी बऱ्याच ठिकाणी कामे चालू ठेवलेली आहेत; परंतु प्रत्येक आदिवासी गट गावाच्या—पाड्याच्या समस्या अतिशय वेगवेगळ्या असल्यामुळे आदिवासींच्या दुखण्यांवर एकच मात्रा सरसकट लागू होत नाही. बऱ्यापैकी आर्थिक परिस्थिती असणारा पठारावरचा कोकणी आदिवासी आणि दुसरीकडे आकाशाचे पांघरूण ल्यायलेला माडिया ही दोन्ही टोके पाहिली म्हणजे या समाजाच्या समस्या कशा विविध आहेत त्याचे प्रत्यंतर येते. आदिवासी समाजातले विविध समुदाय आणि असंख्य

पाडे पाहिले म्हणजे सरकारच्या प्रयत्नाशिवाय या समाजाचा विकास दृष्टिक्षेपातही शक्य नाही हे पटते. मागास जातीस प्रगतिपथावर आणणे व आदिवासी समाजाचा विकास साधून त्याना प्रगत समाजाच्या जवळपास आणण्याचा प्रयत्न करणे हे घटनाकारांनीच उद्दिष्ट ठरवून दिलेले असल्याने शासनालाही हे एक आव्हानच आहे आदिवासी उपयोजनेच्या रूपाने हे आव्हान सरकारने स्वीकारलेले दिसते.

सामान्यपणे बिगरआदिवासी विभागासाठी असलेली धोरणे, गरज, कामकाजाची चौकट आणि सरकारी वा सहकारी यत्रणा ही आदिवासी विभागासाठी उपयोगी पडणार नाही, हे आदिवासी उपयोजनाची अंमलबजावणी करणारानी लक्षात ठेवले पाहिजे. हे गृहीत तत्त्व जर स्वीकारले नाही आणि आदिवासी विकासाचे या उपयोजनेच्या द्वारे माडलेले गणित जर नफा-तोटयाच्या परिमाणात बसविले तर आदिवासी विकासाचा प्रयत्न हा वरवरचा दिखाऊ प्रयोग ठरावा.

केवळ भूतदया आणि सामाजिक जाणिवेतून *आतापर्यंत* स्वेच्छेने *आणि उत्स्फूर्तपणे* अनेकानी आदिवासीच्या विकासाचे काम हाती घेतलेले आहे. या मंडळीच्याच हातात हात घालून आणि खाद्याला खादा भिडवून आता सरकारी प्रयत्नाद्वारे लोकप्रतिनिधी आणि सरकारी नोकराना या उपयोजनेच्या अतर्गत काम करावयाचे आहे. असे असले तरी पहिल्याची प्रेरणा व आत्मशक्ती आणि दुसऱ्याचे 'कर्तव्य' यातला मूलभूत फरक वेळीच लक्षात घेणे अगत्याचे आहे. सरकारी यत्रणा म्हटली की, नफा-तोटयाचे गणित आणि नियम व कालमर्यादेची चौकट अपरिहार्य ठरते. या विकास-योजनेचा भाग म्हणून आदिवासीपर्यंत पोचणारा पहिला दुवा म्हणजे सरकारी नोकर! त्याच्या कार्यपद्धतीवरच या योजनेचे यश बव्हशी अवलबून आहे. त्याच्या मनात आदिवासी विकासाची इच्छाशक्ती नसेल तर पगारापोटी ही सेवाभावाची प्रेरणा कशी निर्माण होणार?

आदिवासी क्षेत्रात काम करावयाचे म्हटले म्हणजे त्याच्या समस्येशी एकरूप होणे, त्याचा विश्वास संपादन करणे आणि स्वत.च्या आदर्शाने त्याची सास्कृतिक प्रगती साधणे ही तीन सूत्रे महत्त्वाची आणि पायाभूत ठरतात. आदिवासी विभागात नोकराची घर व खाण्या-पिण्याची होणारी आबाळ, बिगरआदिवासी विभागात राहणाऱ्या कुटुबियांच्या देखभालीची काळजी आणि त्यातून 'बदली'ची वाट पाहात दिवस ढकलण्याची सर्वत्र आढळणारी प्रवृत्ती ही आदिवासीच्या विकासाला खीळ घालणारी ठरेल, यात नवे काय? सरकारी कर्मचारी म्हणून त्याच्या अडी-अडचणीचा विचार होऊ नये व त्यांनी पगार घेतात म्हणून राबलेच पाहिजे असे दूरान्वयानेही येथे सुचवावयाचे नाही. परतु या वर्गाचे हित आणि सोय व आदिवासीची युगायुगाची मानवतेची हाक यातून तडजोडीचा मार्ग काढला नाही तर आदिवासी उपयोजनेचा डोलारा कोसळूनच पडेल. खरे सांगायचे तर शासकीय पातळीवरून या प्रश्नाचे गाभीर्य अद्यापही समजून न घेतल्याने आजची सरकारी यत्रणा ही आदिवासी विकास कार्यक्रम राबविण्यास असमर्थ ठरते की काय, अशी साधार भीती वाटू लागली आहे

या 'साधार भीती'ची कारणे अशी. आदिवासी उपयोजना राबविणारा बव्हशी कर्मचारीवर्ग बिगर आदिवासी क्षेत्रातला आहे केवळ निरुपाय म्हणून ही नोकरी आज त्याने स्वीकारलेली आहे बिगर आदिवासी क्षेत्रात सध्या मिळणाऱ्या वेतनापेक्षा कमी वेतनाची नोकरी जर त्याला अन्यत्र मिळाली तर तो जाणारच म्हणजे आदिवासीचा विकास त्याच्यापुढे नसून ही नोकरी (सर्व्हिस म्हणजे सेवा नव्हे तर चक्क एम्प्लॉयमेंट) म्हणजे केवळ स्टेपिंग स्टोनच! असा नोकरवर्ग आदिवासी विभागात ही विकास योजना कितपत मन लावून राबविणार?

आदिवासी परिसरातील जीवनावश्यक वस्तूच्या उपलब्धतेच्या, सेवकाच्या कुटुबियांतील शिक्षण व आरोग्याच्या आणि राहणीमानाच्या समस्याही मुळात प्रचड आहेत. मग बिगरआदिवासी कर्मचारी वर्ग लाख इच्छा असूनही या विभागाशी कसा एकरूप होणार? एवढेच नव्हे तर आदिवासी नोकरदाराच्या देखील प्राप्ती सुसगत अशा अपेक्षा वाढल्याने तोही आदिवासी विभागात राजीखुषीने राहील असे आज ठामपणे सांगणे कठीण दिसते. आदिवासीच्या समस्या सोडविण्यासाठी नियम-उपनियमाची जी सरकारी चौकट आहे ती पोलादी नसावी. तिच्यात लवचिकपणा हा आवश्यकच आहे. हा लवचिकपणा अद्यापि स्वीकारण्यात आलेला नाही.

यातूनही मार्ग काढता येण्यासारखे आहेत. जे सरकारी नोकर आदिवासी विभागात काम करण्यास नाराज आहेत त्याना तात्काळ बिगरआदिवासी विभागात हलविले जावे. यातून एक साधेल. त्याच्यावर खर्च होणाऱ्या पैशाची बचत! आदिवासी उपयोजनेवर जवळ जवळ ११३ कोटी रुपये खर्च व्हाययाचे आणि म्हणूनच ही योजना इच्छुक व समर्थ यत्रणेच्या माध्यमातूनच राबविण्याचे प्रामाणिक प्रयत्न व्हावे अशी अपेक्षा करणे चूक ठरू नये. अशा स्वरूपाची यत्रणा उभारण्यास काही कालावधी व पैसा जरी खर्च झाला तरी तो सार्थकीच लागेल. ही यत्रणा उभारण्यासाठी जे जे प्रयत्न केले जातील त्यात पुढील मुद्द्याचाही विचार व्हावा.

वनखात्यात प्रत्यक्ष जंगलात राहून काम करणारे कर्मचारी असतात नोकरी स्वीकारतानाच आपल्याला आयुष्यभर जगलातच काढावे लागणार आहे ही गोष्ट त्यानी गृहीतच धरलेली असते तशाच खास नियमानुसार आदिवासी विभागासाठी स्वतत्र आदिवासी यत्रणा उभारण्यात यावी. या सेवेचा हवा तर १० वर्षाएवढा कालावधी निश्चित करण्यात यावा. या काळात सेवकाला *बिगरआदिवासी विभागात* बदलण्यात येऊ नये तसेच कराराआधी—म्हणजेच नोकरीचा काळ सपण्यापूर्वी—जर एखादा सेवक नोकरी सोडून गेला तर तो बडतर्फ झाला असेच मानण्यात यावे ही यंत्रणा शक्यतो खातेनिहाय असावी. म्हणजे एकेका *विभागाच्या सेवकाचा 'कोटा' पूर्ण होताच* त्या विभागाची कामेही गती घेऊ शकतील. अर्थात हा नवा दृष्टिकोन स्वीकारताना केवळ बेकारीपायी व नोकरीसाठी म्हणून अपात्र माणसेही जागा अडविण्याचा हा धोका सभवतो खरा, पण आदिवासी विकासासाठी कठोर *उपाययोजना व जरूर ती दक्षता* घेणे आवश्यकच ठरते

आतापर्यंतच्या आदिवासीच्या विकासातील अपयशाचा डाग धुऊन काढायचा प्रामाणिक प्रयत्न करायचा असेल तर झालेल्या चुकाची पुनरावृत्ती होऊ न देणे आवश्यक आहे. □

६ डिसेंबर : डॉ. आंबेडकर पुण्यतिथी. एक चिंतन

# धर्मांतर आणि अस्पृश्यता

प्रा. झुंबरलाल कांबळे

१४ ऑक्टोबर १९५६ म्हणजे एकवीस वर्षांपूर्वी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या असख्य अनुयायांसह बौद्धधर्मात प्रवेश केला ! ही घटना भारताच्या सामाजिक इतिहासात अपूर्व आहे. अगदी प्राचीन काळापासून आधुनिक काळापर्यंत धर्मांतराच्या अनेक घटना भारतात घडल्या. ह्या घटना काही वेळा धर्मसंस्थापकानी घडविल्या तर अनेक वेळा राज्यकर्त्यांनी घडवून आणल्या. परकीय राजांनी इथे आपली सत्ता स्थापन केली. ती अधिक भक्कम करण्यासाठी साम–दाम–दंड–भेद या नीतीने धर्मांतरे घडवून आणली. अगदी प्रचंड प्रमाणावर ! त्यातूनच आजचा भारतीय समाज तयार झाला आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे स्वत. धर्मसंस्थापकही नव्हते किंवा लौकिक अर्थाने राजाही नव्हते. असे असूनही त्यांनी धर्मांतर घडवून आणले ! हिंदू समाजाला प्रचड हादरा दिला ! !

एकवीस वर्षांपूर्वी अस्पृश्य समाजाने धर्मांतर केले म्हणजे काय केले ? त्याची सामाजिक फलश्रुती काय आहे ? या प्रश्नाचे चिंतन करीत असताना मनात जे विचार आले त्याचे स्वरूप पुढील प्रकारचे आहे.

या प्रश्नाना दोन बाजू आहेत. एक म्हणजे पूर्वास्पृश्य किंवा बौद्धधर्मीयाची बाजू व दुसरी म्हणजे सवर्ण हिंदूची बाजू.

बौद्धधर्माची दीक्षा घेतल्यामुळे खरोखरच आमच्या मनात–एकूण जीवनपद्धतीत काही फरक पडला आहे काय ? या प्रश्नाचा एक बौद्ध म्हणून मी विचार करतो तेव्हा मला वाटते की, आमच्या जीवनपद्धतीत बराच फरक पडला आहे.

महार, मांग, चांभार, ढोर या धर्मांतर केलेल्या पूर्वीच्या जाती होत. धर्मांतरामुळे त्यांचा निश्चितच फायदा झालेला आहे व पुढेही होणार आहे. ह्या धर्मांतर केलेल्या सर्व जाती वेगवेगळ्या नावांनी किंवा जातीनी न ओळखल्या जाता बौद्ध ह्या एकच नावाने ओळखल्या जातात. हा एक अत्यत महत्त्वाचा फायदा आहे. ह्या एकेका जातीत पूर्वी विविध प्रकारच्या पोटजाती होत्या. बौद्धधर्माची दीक्षा घेणाऱ्यांमध्ये महार जातीची संख्या अधिक आहे. या महारजातीत बऱ्याच पोटजाती होत्या आणि अजूनही आहेत. बारा ते साडेबारा जाती–पोट जाती असलेल्या या समाजात बेटी-व्यवहार होत नसत. सध्या काही प्रमाणात होतात. या पोटजातीत काही प्रमुख तर काही गौण जाती आहेत.

महाडजवळच वडवली या नावाचे गाव आहे. तिथे तुकाराम विठ्ठल हाटे या नावाचे ऐंशी वर्षांचे एक आजोबा राहतात. स्मृती शाबूत आहे. त्यांनी महाडच्या सत्याग्रहात १९२७ साली भाग घेतला होता. त्याची मुलाखत घेतली. त्यांनी महाराच्या साडेबारा जाती पुढीलप्रमाणे सांगितल्या.

प्रमुख जाती साडेतीन (१) बेल्या महार, (२) पानमहार, (३) सोमवशी महार आणि अर्धा चाभार. बाकीच्या नऊ जाती कनिष्ठ. त्याची नावे अशी : लाडवान, तेलवान, गोसलवान, चेटकर, पेटकर, वडार, बेलदार, कोलाटी, ठाकूर. प्रांतपरत्वे या जाती–पोटजातीना वेगळी नावे आहेत. विदर्भात महाराच्या एकूण बारा जाती–पोटजाती प्रचलित होत्या. त्या अजूनही पूर्णपणे नष्ट झाल्या आहेत असे नव्हे. त्यात बावने, बारके, कोसरे, लाडवन, सोमस ह्या प्रमुख व बाकीच्या पोटजाती समजल्या जातात.

प्रत्येक पोटजात धर्मांतरापूर्वी स्वत.ला इतर जातीपेक्षा श्रेष्ठ समजत असे. शिवाय चांभाराने महारांना कनिष्ठ लेखायचे, तर महाराने ढोराला कनिष्ठ लेखायचे ! जातीजातीत व पोटजातीत भक्कम भिंती होत्या; पण ज्यांनी ज्यांनी म्हणून धर्मांतर केले ते सर्व बौद्ध म्हणूनच एकमेकाना ओळखू लागले. हिंदू धर्मातील तेहतीस कोटी देव मानायचे त्यांनी सोडून दिले. धर्मांतर करायचे याचा अर्थ वरील सर्व गोष्टी करायच्या अशीच बौद्ध धर्माची शिकवण आहे. असे बऱ्याच अंशी घडण्याच्या मार्गावर आहे काही अंशी घडलेले आहे; पण शंभर टक्के घडलेले नाही. बौद्धधर्माची दीक्षा घेतलेले सर्वच लोक स्वत:ची पूर्वीची जात किंवा धर्म पूर्णपणे विसरलेले नाहीत. स्वत:स बौद्धधर्मीय म्हणविणारे काही सुशिक्षित लोक अजूनही हिंदूच्या देवताची पूजा करतात. गणपती बसवितात. एकादशण्या घालतात. कधी उघड, तर कधी चोरून–लपून आणि हे सर्व करूनही स्वत:ला बाबासाहेब आंबेडकरांचे अनुयायी म्हणवून घेतात. असेच लोक स्वत:च्या पोटजाती विसरत नाहीत.

## जुने संस्कार

असे का व्हावे ? त्याला विविध प्रकारची कारणे आहेत. त्यातील एक अत्यंत महत्त्वाचे कारण असे की, धर्मांतर प्रत्यक्षपणे करणारी अस्पृश्य हिंदूची पिढी अजूनही जिवत आहे. या पिढीच्या आयुष्याचा फार मोठा भाग हिंदू धर्मात– संस्कृतीत– गेलेला आहे. म्हणून ही जुनी–शरीराने किंवा मनाने–पिढी स्वत चे पूर्वीचे हिंदुत्व, महारपण पूर्णपणे विसरू शकत नाही. ही पिढी जोपर्यंत संपूर्णपणे नष्ट होत नाही, तोपर्यंत हे असेच चालणार.

या पिढीच्या पाठोपाठच जन्मलेली दुसरी पिढी आहे. ती पहिल्या पिढीहून वरी आहे. म्हणजे बौद्धधर्माकडे अधिक झुकणारी पण शभर टक्के न झुकणारी आहे. कारण तिच्या मनावरही पूर्वसस्कार घडलेले आहेत.

या पिढीनतर जन्मलेली तरुणांची तिसरी पिढी मात्र अधिक आशादायक आहे. बौद्ध धर्माकडे, जीवनपद्धतीकडे अधिक झुकणारी आहे. हा धर्म जीवनात आचरण्यासाठी धडपडणारी आहे. अर्थातच प्रत्येक गोष्टीला काही अपवाद असतात. तसेच इथेही काही अपवाद सापडतील, पण तीन-

चार-पाच अशा पिढ्या जसजशा जात राहतील, तसतशा जाती-पोटजाती कदाचित नष्ट होतील; इतिहासजमा होतील. धर्मांतराची हीच सामाजिक फलश्रुती असावी, हे बाबासाहेब आबेडकरांचे एक स्वप्न होते. ते साकार व्हायला बराच काळ जावा लागेल. त्यासाठी केवळ एकवीस वर्षे हा अत्यंत अल्पकाळ आहे.

हिंदु धर्मावर म्हणजे सवर्ण हिंदू धर्मीयांवर या धर्मांतराचे काय परिणाम झाले? ते तसेच का झाले? या प्रश्नांचा विचारही आपणाला पुढीलप्रमाणे करता येईल.

त्यांना वाटते, पूर्वीचे महार, मांग, ढोर, चांभार बौद्ध झाले म्हणून काय झाले? त्यांची जात थोडीच नष्ट झालेली आहे? महार ते महार व माग ते मागच! हिंदूना असे का वाटते? त्याची अनेक कारणे आहेत. त्यापैकी एक अत्यंत महत्त्वाचे कारण असे की, अस्पृश्याच्या दृष्टीने धर्मांतर करणे ही घटना कितीही अपूर्व असली तरी त्याच्या दृष्टीने ती तशी नाही ही घटना केवळ वीस-एकवीस वर्षांपूर्वी घडली. म्हणजे जी प्रौढ वयस्कर पिढी सध्या वावरते तिच्या डोळ्यांदेखत घडली. धर्मांतर करणारा कुणी तरी दगड्या-धोंड्या पूर्वी महार होता. मांग होता. हजारो वर्षांपासून तो तसाच होता. आपला गुलाम होता. या गुलामाने शिक्षण घेतले काय? चांगले कपडे अंगावर घातले काय? मोठा सरकारी अधिकारी झाला काय? आमदार-खासदार-मंत्री झाला काय? त्याने बौद्ध धर्माची दीक्षा घेतली काय? म्हणून त्याची गुलामगिरी– मूळ जात थोडीच नष्ट होणार आहे? त्याने आपल्या पायरीनेच वागावे! पायरी सोडल्यास आम्ही त्याची मुळीच गय करणार नाही. त्याच्या आया-बहिणीची नग्न धिंड काढल्याशिवाय राहणार नाही. नाही तरी गुलाम स्त्रियांना इज्जत असतेच कुठे? त्यांचे डोळे फोडल्याशिवाय राहणार नाही. गुलामाला डोळे असले काय-नसले काय, सारखेच. देवीपुढे त्याचा बळी दिल्याशिवाय राहणार नाही. नाही तरी आम्ही गळ्यास दावे बांधून पाळलेला बोकडच ना तो. त्याच्यावर बंदुकीच्या फैरी झाडल्याशिवाय राहणार नाही. आमचा तो पिढीजात हक्कच आहे!

या पिढीनतर जन्माला आलेली सवर्ण हिंदू पिढी या प्रश्नाकडे थोडीशी सहानुभूतीने पाहते आणि तिच्यानतर जन्मलेली तरुण सवर्ण हिंदू पिढी या प्रश्नाचा सहानुभूतीने विचार करते. कधी कधी इतरांनाही विचार करायला लावते. म्हणजे बौद्ध धर्मीयांप्रमाणेच, ही तिसरी हिंदू पिढी अधिक डोळसपणे या प्रश्नाकडे पाहते. बौद्धधर्मीय लोक गुलाम नाहीत असे त्यांना जाणवू लागते.

## चार–सहा पिढ्यांनंतर!

या दोन तरुण पिढ्या ज्या पद्धतीने या प्रश्नाचा विचार करतात, तीच गती व दिशा चालू राहिली तर तीन-चार-पाच-सहा पिढ्या गेल्यानतर–अनेक पिढ्या गेल्यानंतर बौद्धधर्मीय लोक पूर्वी महार-माग-चांभार-ढोर होते याचा लोकाना विसर पडू लागेल. खुद्द बौद्धधर्मीयांना विसर पडू लागेल. त्यातील पोटजातीना विसर पडू लागेल. तो तसा पडावा हेच तर डॉ. बाबासाहेब आबेडकराचे एक स्वप्न होते नाग, आर्य, अनार्य, द्रविड हे शब्द जसे ऐतिहासिक बनले तसेच महार–मांग–ढोर–चांभार हे शब्दही ऐतिहासिक बनतील; तसेच ते बनावे.

या संदर्भात अलीकडच्या ऐतिहासिक घटना पाहण्यासारख्या-विचार करण्यासारख्या आहेत. मुस्लिम व खिश्चन धर्माचा विचार करीत असताना आपणाला असे दिसते की, या धर्मातही अंतर्गत भेद असतात. अनेक महार, माग, चांभार, ब्राह्मण जातीच्या लोकांनी बाप्तिस्मा घेतला म्हणजे खिस्ती धर्मात प्रवेश केला. त्या सर्वांना हिंदू लोक खिश्चन म्हणूनच ओळखतात. मूळ जातीने ओळखत नाहीत. म्हणूनच एखाद्या खिस्ती माणसाला राहण्यासाठी सवर्णीयाच्या वस्तीत जागा मिळायला फारशी अडचण पडत नाही जेवढी ती बौद्धधर्मीयाना पडते. कारण त्याच्या धर्मांतराला बराच कालावधी लोटलेला असतो.

मुस्लिम समाजामध्येही धर्मांतरित लोक बरेच आहेत. म्हणूनच कोकणात डिंगणकर, देशमुख, कुलकर्णी ही आडनावे. जशी ब्राह्मणात आढळतात, तशीच मुस्लिम समाजातही आढळतात. इकडचे मुस्लिम उर्दूऐवजी सफाईदार मराठी भाषा बोलतात. या समाजामध्ये ब्राह्मणांशिवाय इतर बऱ्याच जाती आल्या असण्याची शक्यता आहे; पण सध्याचा हिंदू समाज त्याना सर्वांना मूळ जातीने न ओळखता मुस्लिम या एका जातीनेच ओळखतो व केवळ धर्मासाठी ही जात एकत्र येते–नांदते. अंतर्गत भेद बाजूला दूर ठेवते.

तसेच बौद्धधर्मीयांचे होणार आहे. डॉ. बाबासाहेब आबेडकर भविष्याचा अचूक वेध घेत असत. म्हणूनच त्यांना वाटले असेल की, बौद्धधर्मीय लोक काही पिढ्यानंतर आपल्या मूळ जाती विसरतील. अंतर्गत भेद विसरतील. गुलामगिरी फेकून देतील. एक होऊन शत्रूशी टक्कर देतील. त्यातच त्यांच्या प्रगतीची बीजे रुजलेली असतील.

डॉ. बाबासाहेबाचे हे स्वप्न साकार होणार यात सदेह नाही; पण ते कधी होणार हा खरा प्रश्न आहे. आजच्या बौद्ध व हिंदू तरुण पिढीने ते लवकरात लवकर साकार होण्याच्या मार्गावर तरी निदान आणून सोडावे, म्हणजे मग धर्मांतर केल्याचा पश्चात्ताप तरी बौद्ध तरुणाना होणार नाही. □


विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य,
लेखनस्वातंत्र्य या मूलभूत
मानवी हक्कावर श्रद्धा असणाऱ्यांना
विचार करायला लावणारी
प्रभावी जीवनकथा

मॅक्झिम गॉर्की
सुमती देवस्थळे
मूल्य दहा रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ
पुणे ४११ ०३०

कथा

# सगुणामाय

कुं. ल. पुरी

एक झोपडं. चद्रमौळी. कधीतरी शेकारलेलं चंद्राचा परकाश झिरपणारं. पावसात हजारो डोळ्यानी रडणार. एक आधार. मोडका का असेना. नसल्या परीस असलेला बरा.

रात अधारी. झोपडीत काळामिच्च अधार. त्यात मिणमिणारा रॉकेलचा एक दिवा धुरकटलेली चूल...धूरच धूर. ... घरागत मोडकळीस आलेली सगुणामाय. सत्तरी वलाडलेली. लाकडागत वाळलेली मान डुगूडुगू हलत्येय्. थरथरल्या हातानं पीठ मळून भाकरी थापतीय्...चुलीच्या नावानं शख करतीय्, 'काय मेलं चुलगट, पेटत बी नाय असा जीव कातावतो. असा सताप येतो की चुलीत पाणी टाकावं अन् चूप बसावं...पन पोटाचा खळगा भराया नको? कच्च-पक्क...कसं तरी ढकलायच पोटात...आता भीम्या येईल वरडत' अस म्हणत भाकरी डोळ्याजवळ नेली–भाजली की नाही ते पाह्यला. डोळ्यानी तरकत बी नाय. तव्हा आंगठ्याच्या नखान टोचून पाह्यलं. भाजली अस वाटून ती दुरडीत टाकली. लाकडं वली व्हती, पेटतना. जीव मेटाकुटीस आला. फूऽऽ फूऽ फुकली... नाका-तोडात धूर गेला. ख्यॅऽऽख्यॅऽऽ ठसकली. डोळ्यात पानी आल.

'माय्योऽऽ!' भीमा भायरूनच वरडला.

सगुणामाय खिणभर थरथरली. काळीज लकालका हलल 'आला माहा साता जलमाचा वैरी!' कातावून मनाशी बडबडली. 'अव ए मायऽ! ...च्या मायला मी... येरडी बोलत बी नाय!' सगुणामाय आपली गप बसली. व्हट गच्च आवळले. थपकन् हातावरली भाकर तव्यावर टाकली भीमा झुकाड्या खात खात दारात येऊन तडकला,

'माय्येऽऽ आँ...व्हट शिवले की कानात बोळे घातले म्या कव्हापास्न वरडतूया तर तू आपली गप! एक नाय आन् दोन नाय...' माग वळून म्हणतोय, 'ये...ये गगे ये. आजची रात घर तुहंच...' दोघं आत आली सगुणामायच्या डोळ्यापुढं सावली डळमळली. डोळ फाडून बघितलं...अंधुक अधुक दिसल.

'माय, काय केल व खायल?' भीमान खाली बसत इचारल. ती पन वसली त्याला खेटूनच.

'वाढ तुकडा लवकर. जे काय असेल ते. दोन ताट...ही गगी पन जेवल इथ...'

'कर...कर गोळा, आणखी दोनचार गावभवान्या. मी हायेच की जेवू घालायल.' सगुणामायची कुरकुर.

भीमा ताडकन उठला भितीकड चालला ताट सोधाया

'आर वाद्या, तिकड कशाल जातूस?'

'परात बघतूया!'

'भलतीकडच ढोस आणखी दारू.. बस! मी देत्ये...'

'पोटात आगडोब उसळलाय्...वाढ विगी विगी!' तो आपल्या जागेवर बसत म्हणाला.

'पोटात काऊन आगडोब उसळणार नाही बापू. आणखी पी!...'

'...च्या मायला, नस्ती कटकट गपचिप वाढायच तर वटवट करतीया!',

सगुणामायन दोन परातोत दोन भाकऱ्या टाकल्या. भुरका टाकला. दोघांच्या म्होरं ताट आपटली, 'गिळा!...'

'बापू खाय चूपचाप. नशीव की चटनी-भाकरी मिळतीय! मी खपल्यावर उपाशी मरशील. माव्हा जीव हाये तोवर घे रावून. उठल्या-सुटल्या बाई न् बाटली! रातदिस धुदीत म्हाणारा तू. घरी पैसा देतूस का बराबर...नेहमी लाटतोस मल!' अस बडबडत ती चुलीजवळ येऊन बसली. शेवटच्या भाकरीच पीठ मळू लागली.

'बर बर, वटवट बंद कर! ...' त्यो गगीकड बघत म्हणाला,

'खा न ग'

'मलं भूक नाही!'

'घरी खात असशील तूप-पोळी...तूही कमाईच जबर...ही गरीबा घरची चटनी-भाकरी, चव घेऊन बघ!' गंगीनं स्वतःच्या परातीतील तीन कोर भाकर त्याच्या परातीत टाकून एक एक घास खाऊ लागली.

'तेल असल तर टाक!'

'नाही. चटनीवर पानी टाक न् खा!'

'मायलाऽ! .. घर हाये की काय हेऽ! जव्हा पहावं तव्हा हे नाही...ते नाही.'

'बापू, आणून देशील त राहील घरात. तुहा तर.'

मध्येच तिला थाबवून भीमा म्हणाला, 'बर बर, तोड बद कर...खाय गं गगे, उद्या तुलं गुलाबजांबूनची पार्टी देतो...मल वाढ भाकरी..'

दुर्डीत अर्धी भाकर ऱ्हायली. ढेकर देत भीमा उठला

'मायऽऽ थोडे पैसे हायीत का?'

'नाही रं बाबू कसले पैसे?'

'आँऽऽ? मजुरीतले पैसे मी घरी देतो नं?'

'किती? एक रुपया...दीड रुपया... आज काय व्हतं त्यात? मी हाये म्हून... निम्मी मजुरी तं ढोसण्यात जाते...आज घेतली असल नाय?'

'थोडीमी...जास्त नाय...!'

'...मंग कशाल हवा पैसा?'

'...च्या मायला...लईच चाभारचवकशा लावल्या...'

'...ह्या सटवीला द्याचे असतील...'

'तुल का करायच...बाड्या पंचायती... दे म्हणजे दे!...'

'नाही तर देऊ कुठून? ...'

'मी माय मंतोय बघ...कजूष कुठली... दे...दे...मी परत करतो!'

'माहीताय् परत करनेवाला...आजपत्तूर कितीक परत केले?'

'दे व माय ..दे म्हणतो बर...'

वाद वाढला. भीमा बरळू लागला. सगुणामाय शिव्या देऊ लागली.

'पैसा पाहिजे. दारू प्याला अन् रांडावर उधळायला...'

'व्हय पाहिजे काय म्हणणं हाये? आँऽऽ? तू काय माय हायेस...एवढा मोठा घोडा झालो...तीस वर्षांचा...दिली का बाईल करून...?'

'कुणी पोरगी देत नाही, मी तरी काय करू?...तू हे असे गुण उधळतोस...'

'माह्या गुणामुळ नव्ह, तुह्या गुणामुळ'

'म्हंजे?'

'कानात बोळं घालून राहतेस गावात? लोक काय काय बोलतात ते!'

'लोकं काय बी बोबलत्यात! लोकं चांगल्यालं वागल म्हनत्यात!'

'मंग तूच सांग...उठल्या-सुटल्या इठ्ठल–इठ्ठल करणाऱ्या–टाळ कुटणाऱ्या वारकऱ्यास माह्यासारखं पोर का व्हावं? साग...खरं...खर...' भीमा कर्कश आवाजात इचारतोय्!

सगुणामायच्या डोळ्यापुढं काजवे चमकले. मथारपणामुळ गळलेली...मानसिक वळ नव्हतं. हा आघात सहन झाला नाही. थरथर कापत भिंतीच्या आधारान उभी राहिली. काळीज धडधडू लागल. भीमा तिला राकेसागत भयंकर वाटू लागला.

'बोल...बोल ना...आता का दातखिळी बसली?'

'मी तुहीच माय...'

'चूप! माय आसशील...नाय कोन म्हतं...बाप कोन?'

'भीमाऽऽ आरं काय हा सवाल...?'

'हं...' भीमा पचकन् भोईवर थुकला.

सगुणामायच डोकं गरगरलं पोटचा पोर...साधूच्या पोटी शैतान...

'जाऊ दे. नस्ता वाद कशाला...मलं पैसे पायजेत...'

'पैसे नाहीत...' सगुणामायचा खचलेला आवाज.

'खोटं...खोट...कुठं तरी असतील. मी बघतो...'

झुकांडचा खात भीमा उतरंडीकडं जाऊ लागला.

'नाहीत रे बापू...'

'बघतो की...'

जवळ-जवळ सगळी मडकी रिकामी. भीमाचा धक्का लागला. दोन्ही उतरडी घसरल्या. मडकी फुटली काही वस्तूची मिसळ झाली. सगळ्यात खालचा एक डेरा...जेवारीनं भरलेला. भीमान उबडला. सगुणामाय दचकली. गेल धन.. गेलं. जिवापाड...आयुष्यभर जपलेल. मोठ्या नेटानं धावली. भीमाच्या लक्षात यायच्या आतच झडप घातली. एक जुनी ल्हानशी पिशवी सगुणामायच्या हाती आली.

'दे...माह्याशी खोटं बोलतेस! साली, माय हाये का कोन?...दे, मल बघू दे!'

'नाही! माहा मंगळसूत्र आन् नथ हाये यात!'

'मंग तुह्या मथारीच्या काय कामाची?'

'जीव गेला तरी मी देनार नाही!'

भीमानं पिशवी हिसकली. माय तिला बिलगली. 'मी नाय देणार...'

भीमानं जोरान तिला ढकलली.

'चल ग गंगे...आँ...मायला ही गगी...'

गगी कव्हाच निघून गेली व्हती. 'जात्येस कुठं? आता तुलं एक–दोन महिनं नाही सोडत..' बडबडत भीमा भाईर पडला.

सगुणामाय पडली जात्यावर. डोकं फुटल. भळभळा रघत वाहतय्...कुतऱ्यान अर्धी भाकर पळवली...

गगी येत चाललीय! वेदना...भयंकर वेदना...शरीराच्या–मनाच्या...

तव्हा ती माय नव्हती होती सगुणाबाय. बाई. पस्तिसी वलाडलेली सगुणाबाई तिन्ही सांजेला बाळ खेळवत बसली

'रंगू बाजारला जाते ..जाऊ दे!
गुळ-फुटाणं खाते.. खाऊ दे!'

बाळाचे पटापट मुके घेती...त्याला हसविती...स्वता हसती...बाळ पन खुदुखुदू हसतो. 'गुलामा, कसा हसतूस रे गोड...गोड!' त्याला पायावर उभं करती. डुगुडुगू हालतंय...पडायच्या अगुदर धरतीय्...

खेळवता खेळवता ती स्वताले इसरते. ती इसरते की, ते बाळ तिचं नव्हं...ती गुगलीय जनू आपल्याच बाळाच्या नादात बाळानं सू केली, 'आऽले बदमास, मुतलास गधड्या...तुलं शिक्षा' म्हणत पटकन त्याचा मुका घेतला. लोकायच्या लेकराच ती किती किती करती! टाळू माखती ..तेलमालीस करती...अंघूळ घालती ..रडक्या लेकराला उगी करण्याचं कसब हाये तिच्याजवळ. लेकराबरुबर लेकरू बनून खेळती...

सध्या बाळाला हातावर धरून नाचवत हाये हे गोड दृश्य तिची जाऊ बघत हाये. तिच्या डोळ्यांत टचकन् पानी आल 'हिला एखाद पोर देवानं द्यावं असतं...'

'माहा सोनुल ग, सोनुलं...' म्हणत बाळाचा गालगुच्चा घेते.

'कमेऽऽऽ अगं ए कमे...' सासूनं सयपाकघरातून आरोळी ठोकली. 'आल्येऽऽ आल्येऽ!' म्हणत कमल घरात पळाली. आकाशात तरंगणारी सगुणाबाई प्रिथमीवर आली–त्या आवाजान.

'बाळ कुठाय?'

'बाईजवळ हाये!'

'सगणीजवळ? त्या वाझूटीजवळ! काय मेली तुही अक्कल! कितीदा तुला सागितलं...'

'हळू बोला सासूबाई...ऐकू जाईल...काय वाटंल त्यांना...'

'ऐकल तर ऐकलं. तिच्या बाच भेव हाये? आन त्याला!'

'बाळ राहतो त्याच्याजवळ. कसा छान खेळतो...'

'वाझ मेली. माह्या पोराचा जलम फुकट गेला. दळभद्री, अवलक्षणी मेली ..नजर लई वाईट. तुही तीन पोर मेलेली झाली. का? तर हिच्या नजरेन करपली ..'

'सासूबाई!...काय तरी बोलता!'

'मी तुह्या बऱ्याचं बोलत्ये. ज्याच कराव बरं त्ये म्हंते माहा खर. मलं काय करायचं...'

'कमल, घे बाई तुहं पोर!' सगुणाबाई तिथूनच म्हणाली. सासूचं बोलणं जिव्हारी लागलं. आधीच पोर नाही म्हून ती मनात झुरायची. 'ह्याचा जलम माह्यामुळं फुकट गेला' म्हणत कुढायची. अपराधी वाटायच. लोकाच्या पोराना खेळवून मनकरमणा करीत असे. जावेला दिस गेले, ही आनदान वेडी व्हायची, मूल झाल तर हिला आस्मान ठेंगनं व्हायच. पोर मेलं की ही दु:खाच्या समुद्रात बुडायची. का कुणाला ठाव, सासू मातर पाण्यात पाह्यची. घालूनपाडून बोलायची. वाझुटी म्हणून तिचं काळीज कापायची!

'द्या...' कमलने पोराल घेतल. हळूच म्हणाली, 'मथारीच काय बी मनावर घेऊ नका!'

सुस्कारत सगुणाबाई म्हणाली, 'मला मूल-बाळ नाही म्हनून...माहा मन कपटी नाही...माही नजर विखारी म्हनं...कमल, माह्या हातात असतं तर माहा उरलेलं आयुख बाळाला दिलं असतं...' सगुणाबाईच्या डोळयातून आसू आले.

'असं काय वर बाई...एवढं वाईट काय वाटून घेता ? मथारी नेहमीच बोबलते... जाऊ द्या. देवाच्या मनात आसंल तर...'

'जाऊ दे. आपले नशीब खोटं ...'

'माहा मन साफ हाये बाई. तुम्ही बाळाला आपलेच समजा ! ध्या !'

सगुणाबाईनं बाळाला जवळ घेतले. हुरदय उचंबळून आले त्यानी बाळाले छातीला लावले.

'कमे ऽऽ!' सासूचा आवाज.

'हो...दिवा लावते...'

'त्या सगणीला लाव म्हणावं. .तू बाळाला पाज...'

'घे कमल, मी करते दिवाबत्ती ...'

कमलजवळ बाळाला देऊन ती दिवा लावायला गेली. लुगडयाच्या पदरानं डोळे पुसले.

कमलचा नवरा तिरसट तर सगुणाचा भोळा. पहिला गोइंदा, दुसरा इठोबा. इठोबा उठसूठ इठ्ठल इठ्ठल करणारा—टाळ कुटणारा—आखाडी – कार्तिकीला पंढरपूरला पायी जाणारा. कीर्तनात इना वाजवणारा सौसारात मन कमी... गोइदाला वाटायच, 'माझ्या-मुळंच घर चालतं. शेत पिकतं. नाही तरी हा वारकरी उपाशी मरंल...'

झाले. जे व्हायचं ते. वाटण्या. दोन भाऊ दोन वाड्यात राहू लागले. एका जीवाच्या दोन जावा येगळया झाल्या. बाळाची सोवत सुटली. सगुणाबाई एकटी पडली. लोकांच्या पोरांना हात लावायचा नाही हे ठरविलं. त्याची पोरं खेळवा. पुनः त्याच 'वाझुटी' म्हणून टिंगल करणार !

'मेल्या त्या देवाशीच भाडायचं – कुठं दुष्काळ पडला त्याच्या राज्यात – त्योही माह्यासाठीच...जियं खायला नाही तियं लेकरांचं लेंढार...अन् माह्या इथं एक बी नाय...देवाघरी न्याव नाही...'

देवालं परसन्न करून घेण्याचे उपाय सुरू झाले उपास केले. बामण जेवू घातले. देवाना अभिषेक केला. जप करविला. देव काही पावंना. शरिराचं चिप्पाड झाल, मन जिद्दीला पेटलं. नवऱ्यालं ती इचारी, 'का वं तुम्ही एवढं देव देव करता तर देव परसन व्हयाच्या ऐवजी का बरं कोपला ? माहीच वटी सुनी का ?'

तो म्हणे, 'देव परीक्षा पाहात आसंल ?'

'दुसरं काही कारन आसंल का ?'

'कारभारनी, अवं...मी तरी काय सांगू ? पोरं व्हायसाठी कमी का प्रयत्न केले ! मी पुरुष म्हनून कमी पडतो का ? मी नामरद हाये का ?'

'काय तरीच बोलनं !'

'मग असं का व्हावं ? तुह्या तनाची भूक शात व्हते, मनाची नाय. मंग असं कर...दुसरा पुरूस बघ ! ...'

सगुणाबाई रागावते, 'मला पाप करायला सागता, काही कसं वाटत नाही ?'

'अवं...काही वाटून काय उपेग ? तुला मूल हवं. माह्यापासून मिळत नाय...भाईर प्रयत्न कर. कदाचित होईल. तुह्यासाठी. तुहं समाधान ते माहा समाधान ! पाडव तर असेच झाले ...'

'झाले असतील. मला तुमच्यापासूनच मूल हवय ...' म्हणत सगुणाबाई पतीच्या कुशीत शिर. मनात इचार येई, 'कुती महाभागवान बाई. आजच्या खत्रुड जमान्यात जलमली असती तर मरुस्तवर 'वांझूटी' राहिली असती.'

देवाला समजावणं सपलं. आता धाक दाखविला पाहिजे. कुणी तरी म्हणाली, 'गवताच्या—कडब्याच्या गंजीला आग लावली की देव पावतो !'

पोरासाठी हपापलेली सगुणाबाई काही बी करायला तयार झाली. छातीवर दगड ठेवला—मन घट्ट केल—अन् एका अंधाऱ्या राती घराभाईर पडली. एकटीच. हातात माचीस घेऊन. खारीतच रामा गवळयाची वैरण होती. त्याला आग लावायची. झपाटयानं निघाली. हातात पाण्याच डबडं. कारण सागायला—पादीत गेलते म्हणायला. छाती धडधडत व्हती. अनवाणी असल्यामुळे काटे मोडले. कळ सोसली. काटे उपसले. गजी जवळ आली. फरकन् काडी वढली. दुरूनच फेकली अन् झपाटयानं पादीत आली. जरा बरं वाटलं. लगबगीनं घरी आली. नवऱ्याशेजारी येऊन झोपली. मागं वळून पाहायची हिंमत झाली नाही.

अर्ध्या राती एकच गिलका झाला. माडवा-वरच्या पोरांनी बोब ठोकली. 'आग...आग' वारा सुसाट व्हता. लोक जमेस्तूर गजी आगीनं खलास झाली अन् जवळच्या माडवाले कवटाळले.आतली जनावरं जीवाच्या आकातान वरडली ... सारे पराणी तडफडत तडफडत जळाले. आग शांत झाली.

रामा गवळी अन् त्याची बायको छाती बडवत रडू लागली. त्याची चार लहान लहान पोरं घाबरली—गोधळली. चिमणीएवढं तोड करून टुकूटुकू पाहू लागली – कधी माय-बापाकडं तर कधी बध्याकडं. गवळयाची बायको कडकडा बोटं मोडून शिव्या देऊ लागली , 'कुन्या सटवीनं दावा साधला. तिच तळपट व्हईल ! माह्या मुक्या पराण्याचा शाप लागल... !'

इकडे सगुणाबाईचं काळीज धडधडू लागल. चेहरा पाढराफटक पडला. घामाझोकील झाली. भाईर रडबोंब चाललीय याचा अंदाज आला. नवरा अचानक उठला; 'का व भाईर कशाची रडारड चाललीय !' ती उत्तरली, 'काय जनू !' नवरा उठून बघायला गेला.

नशीब तिचं. कुणाला काही समजलं नाही. इठोबान गवळयालं मदत केली. जवळचे दोन बईल दिले ! गवत—कडवा दिला. यानंतर रामा गवळी जेव्हा भेटे तेव्हा डोळयात आसवं येत त्याच्या. म्हणत असे, 'सगुणामाय, तुम्ही ... हुता म्हून वाचलो. इठोबा देवासारखा माह्यामाग उभा ऱ्हायला !

कच्चीवच्ची वाचली...देव तुमचं भलं करो !'

देव झोपला व्हता. त्यानं काहीच केलं नाही. सगुणाबाई मातर दररोज आपलं पोट पाही...हातान चाचपून पाही...कधीकधी तिला उगीचंच मळमळ करी !

वर्ष गेल. आत्ता ?

आयुष्याच्या राती फुलोरा आलेल्या आब्याच्या झाडाखाली न्हाली. आब्याचा मोहोर जळून गेला.

शेजारणीच्या उंबरठ्याची पूजा केली. कशानं तरी तिचं मूल मेलं. ती बाई ऊठसूठ उंबरठा पुजणाऱ्यालं शिव्याशाप देई.

जोशी म्हणाला म्हून माळयाची इहीर

पूजली. थाळ पूजलं. तिथल्या आसरा पुजल्या. परत येताना किरडानं चावा घेतला. घरी आली. नवऱ्यालं उठविलं. अंगणात साप चावला म्हून सांगितलं. 'मी आता मरनार...वांझूटी मरनार!' म्हणत रडली. जनावर साधं असावं. थोडेसे उपाय केले. वाचली.

संपले सारे उपाय. आता? वांझपनाचा टिळा लावलाय कपाळी. सटवीच अक्षर, खोटं कसं व्हईल! आपणच कपाळकरटी! शरीराबरूबर आता मन बी थकलं. चाळिसी उलटली. आता कुठल मूल न् काय!

गावात कुणी साधू आला. त्याला म्हणे चाळीस सिद्धी परसन्न व्हत्या. सगुणाबाईतली 'माय' खडबडून जागी झाली. साधूल बलावलं. आला बराबर लोकाचं लेंढार घेऊन. सगुणाबाईनं हातापाया पडून त्यांना पिटाळलं. साधूनं नोकराला इहिरीचं पानी आणायला सांगितल, 'हात, पाय, तोंड सोच्छ धुऊन घे आधी. मंग पव्हरा भोईवर न ठेवता ताब्यात पानी घे! तस्साच परत ये. कुणाल बोलू नगंस! शिवाचा जप कर!'

नोकर पानी आणायला गेला. साधूनं सारं सारं इचारलं. नवरा वारीला गेला म्हणाली. साधूनं डोळे मिटले. बोटाची कांडं मोजली. मंग म्हणाला, 'तुलं मूल होणार. खात्रीनं. मला एक हजार रुपये लागतील. मल नको. बालाजील महापूजा बांधावी लागल. मलं थोडी साधना करावी लागल. उद्या रात्री मी येईन. आवस उद्याची. शुभ मुहरत टळून चालणार नाही. फकस्त घरी तूच हवी. इस्वास असला तर हो म्हन!' सगुणाबाईनं इस्वास हाये म्हटल. नोकर आला. त्याच्या जवळचा ताब्या घेतला. पानी भारल. 'उगवतीकडं तोंड करून बस. हे पानी पी!' तिनं तसं केलं. 'मनोरथ पुरा होवो!' नमस्कार करणाऱ्या सगुणाबाईला साधूनं आशीरवाद दिला.

ठरल्यापरमाणे साधू आला. रिंगण केलं. रिंगणात तिला बसविलं. लिंबं भारली. शेंदुर माखलेल्या दगडाची—कोकण्या देवाची—पूजा केली. उदबत्तीचा घमघमाट. उदाचा धूर... सारं वातावरण कसं भारल्या गेलं. 'नजर माह्या चेहऱ्यावरच ठेव!' साधू म्हणाला. सगुणाबाईला गंमत वाटू लागली. थोड्या येळानं त्यांचं अंग कसं बधिर पडू लागलं. साधूनं ऊठ म्हटलं. उठलं. साधूनं हात दिला व्हता...तो काही तरी पुटपुटत व्हता...

आन् अचानक त्याचा हात त्यांच्या निरीला गेला...

'महाराज, हे काय केलं?' रडका... अपराधी स्वर.

'याशिवाय तुलं मूल होणार नाही. निदान पधरा रात्री तरी तुला माझ्याबरोबर घालवाव्या लागतील...'

'पंधरा?'

'कमीत कमी पंधरा...तस तर मूल होईस्तोवर...'

'ते शक्य नाही...पंधरा...ठीक...' सगुणाबाई पुटपुटली.

आन् खरच सोळाव्या दिशी तिला मळमळायला लागल. तिला आस्मान ठेंगणं झालं. 'मी माय व्हनार...काय बी होवो—पोरग नाही तर पोरगी—वांझ मरनार नाही!' तिच्या आनंदाल सीमा नाही. नाही म्हणायला ते मूल इठोबाच हाये हे पटवायलं थोडसं खोटं बोलावं लागल.

एकेचाळिसाव्या वर्षी मुलगा झाला. साधुचं गावात नाव झालं. सगुणाबाई—इठोबाला वंशाला पोर झालं. आनंदी आनंद. गावात साखर वाटली. सोयऱ्याधायऱ्यांना जेवण दिलं. दानधरम झाला.

इठोबा जास्त दिस जगला नाही. काय झालं की तडकाफडकी वारला.

पोर गुणाचं निघलं नाही. शाळंत गेलं नाही. उनाडू लागल. जवान झालं तर गावातल्या पोरी-बाळींना ताप. दोनदा खेटरं खाल्ले. मथारीनं कोंबडं झाकल्यावरही उजाडलं. तसं लोक समजून चुकले की हे पोर कुणाचं. चेहऱ्याचा आकार...रंग—बांधा... त्या साधूसारखाच. लोक तोंडावर बोलत नसत एवढच. तरी पण एखादं खवचट म्हणे, 'हे पोरं इठोबाचं हायं असं वाटतंच नाही!'

पोर हाताभाईर गेलं. सुधरायचे खूप प्रयत्न केले. पन वाया गेले. दारूची लत लागली. बायाची माडी चढलं. मटका...पत्ते...एक ना दोन...बघता जमीन गेली. घर गेलं. सगुणाबाईच्या चांगल्या वागण्यामुळं लोक तिला लवकरच सगुणामाय म्हणून वळखू लागले. एकटी असली की सगुणामाय स्वत.ला म्हणे; 'सगणे...फुटक्या नशिबाचे. रडणं तुझ्या नशिबी. पोर नव्हतं तेव्हा रडले. आता पोर हाये म्हून रडते. देवालं मागितला पूत तर देवान दिलं भूत! आरं रं...जलम वाया गेला मी वांझच राहिले. मी या पोरासाठी काय काय केलं. चक्क पाप केलं. नवऱ्याच्या माथी मारलं. माहा नवरा देवभोळा. पवितर आत्मा. माह्या स्पर्शानं जणू तो जळाला... देवा, पोर दिलं तस नवरा तरी जगायला हवा होता मरण मल देता मी पापी पोर सुधरलं तरी असत...'

भीमानं आखेर गंगीला आणलंच. 'भडवे, पळून जातीस माह्या घरून. पैसा मोजत असताना.... चल ये घरात.' घरात अंधार. 'मथारी झोपली वाटतं. हं...पड इथ.'

'अव पन तुमची माय...'

'...च्या मायला, नस्ती अडगळ. कुठं झोपली की....' चाचपडलं. हाताला लागली. 'गंगे, दारा सैमूर माहा पटका आंथर...!' त्यानं तिला भाईर नेऊन ठेवल.

'हं...चल ये...अश्शी! घबाड मिळाल. महिन्याची फिकीर नाही. शाब्बास...'

सगुणामाय किती तरी येळ बेसुध पडली व्हती. आता कुठं हळूहळू शुद्धीवर येत हाये. तिला थोडं थोड आठवत....भीमानं पिशवी नेली. 'ने बाप्पा ... माहा सारं जीवानंच लुबाडल दैवानं ... पन पोरा, मनाला लय वेदना होतात ... मी पापी खरी...पण तूही माय हाय बरं...मी पाप केलं, म्हून तू आला. किती लाड केले पन...पोरा माही सपनं मातीत मिळवलीत ... नाना तऱ्हेची — पाप करनारानी ... तुवा पन मल नाव ठेवावं!'

आँ ऽऽ देवा...तोडातून आवाज निघत नाही.

हिवाळ्याची रात. थंडी—भयकर. रघत गोठविणारी.

# अलौकिक आणि ‘ लौकिक ज्ञानेश्वर ’

श्री. देवीदास बागूल यांचे ‘ लौकिक ज्ञानेश्वर ’ हे छोटे पुस्तक ज्ञानेश्वराच्या असाधारण व्यक्तिमत्त्वाचा एका वेगळ्या पातळीवरून वेध घेणारे आहे. बागूल हे भाविक म्हणता येणार नाहीत. प्रखर वास्तवाला कडवेपणाने सामोरी जाणारी एक समाजमनस्कता त्यांच्यामध्ये आहे; पण त्याचबरोबर निरनिराळ्या कलांच्या माध्यमातून प्रकट होणारे जीवनातील नाना प्रकारचे सौंदर्य निरखण्याचा छंदही त्यांना आहे. अनेक अर्थांनी केवळ अनाकलनीय वाटणाऱ्या ज्ञानेश्वराच्या निगूढ व्यक्तिमत्त्वातील काही पैलूवर बागुलांनी या पुस्तकात एक शोधप्रकाश टाकलेला आहे. चार ते आठ पृष्ठांच्या मर्यादेत सामावलेले सहा-सात निबंध येथे एकत्र केलेले आहेत. बागुलानी प्रारंभी लिहिलेली प्रस्तावना देखील एक स्वतंत्र लेख मानावी अशी विचारगर्भ आहे. या साऱ्या लेखनामध्ये बागुलांची एक विलक्षण तरल अशी काव्यात्म सवेदनशीलता भरून राहिलेली आहे. जाणिवेच्या अशा तरल पातळीवर फार काळ टिकून राहता येत नाही. त्यामुळेच की काय, हे सारे लेख इतके छोटे उतरले आहेत. ते छोटे आहेत तेच योग्य आहे, नहून त्यांच्या आविष्कारात ओतप्रोत भरून राहिलेल्या उत्कटतेला ढळा पोचला असता. बागुलाची नीटस विवेचनशैली आणि सुबोध सुंदर भाषासरणी या ललित निबंधाच्या डौलदारपणात मोठीच भर घालतात. मुखपृष्ठ आणि पानापानावरील मजकुराची माडणी ही बागुलांचीच आहे. त्यांची कलाचातुरी त्यातही उठून दिसते. याला श्री. चिं. स. लाटकर यांच्या सुबक मुद्रणाची जोड मिळालेली आहे. हे सारे लेख डोळ्याखालून घातल्यावर ध्यानात येते की, केवळ बहिरंगच नव्हे तर याचे अंतरंगही समृद्ध आहे. त्या दोन्ही अंगाना बागुलाच्या सुजाण अभिरुचीचा कोमल स्पर्श लाभलेला आहे.

## तुकाराम आणि ज्ञानेश्वर

मराठी माणसाने तुकाराम आणि ज्ञानेश्वर या दोघाना माउली हे बिरुद अर्पण केले आहे. त्या दृष्टीने समान असणाऱ्या या दोन विभूतीमध्ये आपल्याला जाणवणारा भेद बागुलानी प्रस्तावनेमध्ये अतिशय हळुवारपणाने व्यक्त केला आहे. परखड अशा तुकारामापेक्षा ज्ञानेश्वरांच्या प्रेमळ व्यक्तिमत्त्वामुळे बागूल अधिक भारावून गेले आहेत हे येथे स्पष्ट दिसते 'ज्ञानेश्वराचे अलौकिकत्व' याला विरोधी म्हणून की काय, ‘ तुकारामांचे सर्वसामान्यत्व ’ असे शब्द बागूल योजतात; पण तुकारामाचे जीवन व व्यक्तिमत्त्व याचे जे अंतिम मूल्यमापन आपल्या मनात साकार लेले आहे, त्याच्याशी ‘ सर्वसामान्यत्व ’ हा शब्द मिळताजुळता नाही. नेमकेपणाने वर्णन करावयाचे तर, तुकारामांनी सर्वसामान्य पातळीपासून प्रारंभ करून व सर्वसामान्यासारखे अनुभव घेत आपला असामान्यत्वाचा प्रवास केला असे म्हणावे लागेल; पण या दोघामधील आणखी एक भेद बागूल सागतात. तो विशेष लक्षणीय आहे. माउलीसारखे आपल्याला जवळ करणारे तुकाराम आपल्या अभंगजीवनात ‘ ओळख दाखवीत नाहीत ’, त्याच्या अभंगात आपल्याला त्याच्याशी ‘ मनमोकळ्या गप्पागोष्टी करायला वावच ’ राहात नाही; याउलट अलौकिक अशा ज्ञानेश्वरमाउलीचे ‘ अलौकिकत्व पाहून ’ आपले मन ‘ हर्षभरित ’ होऊन गेले; असा आपला अनुभव बागुलांनी सागितला आहे. ज्ञानेश्वराचे हे जे लौकिकत्व बागुलाना जाणवले त्यातून त्याचे हे लेख अवतरले आहेत. तुकाराम व ज्ञानेश्वर यांच्या बाबतीतील वरवर पाहता परस्पर विरोधी वाटणारा व तितकाच अनपेक्षित असा हा जो अनुभव बागूल सांगतात, त्यातच त्याच्या स्वतंत्र निरीक्षणशक्तीची ओळख आपल्याला पटते. ही त्यांची वैशिष्टयपूर्ण स्वतंत्र दृष्टी या पुस्तकात अखेरपर्यंत आपली सोबत करते आणि तीमुळे आपल्या आनंदात नवनवीन भर पडते.

‘ अलौकिक पातळीवरचे ज्ञानेश्वर बागुलाना असे प्रेमळ मातेसारखे, जवळचे कसे वाटतात? ही किमया कशामुळे घडून येते ? आणि तुकाराम दूरचे का वाटत राहतात? तुकारामातही कनवाळूपणा आहे; पण त्याबरोबरच त्याच्या व्यक्तिमत्त्वात आणखीही काही भाग आहेत. आपल्याला आलेले व्यवहारातील कठोर अनुभव तुकाराम तितक्याच जळजळीत भाषेत व्यक्त करतात, त्याच वेळी समाजात आढळणारा दभ व ढोग यावर ते प्रहारही करतात. मेणाहून मऊ होणाऱ्या करुणापरतेप्रमाणेच वज्राचाही भेद करू शकणारी प्रहारशीलता तुकारामात आहे. ज्ञानेश्वरात असे प्रहार किंवा दाहकता कोठेच नाही. मायेने तुडुब भरून राहिलेली माउली केवळ हळुवारपणाने फुंकर घालते, तसे ज्ञानेश्वर आहेत. विषासारखा उग्र वाटणारा अनुभवही ज्ञानेश्वराच्या आविष्कारात अमृतमधुर होऊन प्रकटतो. त्याच्या वाणीत सर्वत्र एक कोवळीक व शीतलता भरून राहिलेली आहे. अंतःकरणाच्या केवळ नितळ अशा प्रसन्न वृत्तीमुळे त्यांचा कोणताही उद्‌गार एक असाधारण सौंदर्याचे चांदणे पाघरून उभा राहतो. सर्वसामान्याविषयी अथाग करुणा आणि प्रखर वैराग्याची साथ करीत राहिलेली रसिकता यांच्यामुळे, अलौकिक पातळीवर रमणारे ज्ञानेश्वर आपल्याबरोबर लौकिक पातळीवर वावरत आहेत असा भास आपल्याला होत राहतो. अशा मधुर भासाचे काही क्षण बागुलानी येथे मोठ्या रसिकपणाने टिपलेले आहेत. या महापुरुषाच्या ठायी असलेल्या सौंदर्यवृत्तीमुळे बागुलाच्या मनाचा स्वर *ज्ञानेश्वरांच्या काव्यातील भावस्पंदनाशी* जुळला आहे-

## श्रोतुसंवाद आणि आत्मसंवाद

ज्ञानेश्वरांचे लौकिकत्व न्याहाळण्याचा प्रयत्न बागूल करीत असले तरी त्याच्या अलौकिकत्वाचेही भान त्यांना आहे. ज्ञानेश्वर अखेर एका- अध्यात्मिक पातळीवर वावरत आहेत हे ते जाणून आहेत. त्या अध्यात्मिक पातळीचा खरा स्तर कोणता हेही ते जाताजाता सागतात. ज्ञानेश्वराची अवधानकल्पना स्पष्ट करताना बागूल सहज लिहून

जातात, 'खरे सांगायचे म्हणजे स्वतःशीच बोलावे, स्वतःच्या मनाशीच सवाद करावा ही खरी उच्च अध्यात्मिक पातळी' (पृष्ठ ९). ज्ञानेश्वरानी ज्ञानेश्वरीमध्ये श्रोत्यांशी संवाद केलेला आहे आणि त्या संवादाच्या द्वारा अध्यात्मिक विचार व अनुभव यांचे आदान-प्रदान केले आहे, या संदर्भात बागुलानी हा अतिशय समर्पक असा उद्‌गार काढला आहे. बागुलाचे आकलन कोणत्या उंचीला पोचू शकते त्याची साक्ष येथे मिळते. स्वतःशीच संवाद करण्यात 'खरी उच्च अध्यात्मिक पातळी' साभाळली जाते हे तर खरेच. विशेषत. अद्वैतानुभवाच्या सदर्भात हे विधान अधिक समर्पक ठरते ज्ञानेश्वरांच्या वाङ्मयातही याची खूण दिसते. अनुभवामृतातील उद्‌गाराची व अध्यात्मिक जाणिवाची पातळी अधिक वरची राहिलेली आहे हे आपल्याला जाणवते. ज्ञानेश्वरी हा श्रोतृसंवाद आहे तर अनुभवामृत हा आत्मसंवाद आहे, हेच त्याचे कारण म्हणावयास हवे.

## अलौकिकत्व व लौकिकत्व

ज्ञानेश्वरांचे हे अलौकिकत्व बागुलानी पुरते जाणलेले आहे. त्याची सूचक प्रचिती आपल्याला या साऱ्या निबधांमध्ये अधूनमधून येत राहते. 'मी–तूपणा' हे शीर्षक वाचल्यावर प्रथम असे वाटून जाते की, केवळ सासरिक कलहाच्या पातळीवर वावरणाऱ्या मानवी अहकाराचे काही वर्णन येथे येणार; पण त्याऐवजी अद्वैतानुभवाचा आनंद सतत घेत असलेल्या भगवंतालाही मी-तूपणातील द्वैताची गोडी कशी हवी असते, याचे ज्ञानेश्वरांनी केलेले चित्रण बागूल मोठ्या समरसतेने सांगतात आणि त्याचा धागा कलावताच्या दृष्टीने चराचरातील सौंदर्यप्रतीती येण्यासाठी आवश्यक असलेल्या द्वैतभावनेशी जोडून घेऊन, त्या आधारे ज्ञानेश्वरातील कलावंत प्रकट करतात असे आपण पाहतो; तेव्हा आपल्याला विस्मयाचा एक मधुर धक्का बसतो. मात्र त्या लेखाच्या अखेरीस, 'जोपर्यंत आपण शरीर धारण करीत आहोत तोपर्यंत शरीराची क्रिया नाकारणे हे केवळ गावढळपणाचेच लक्षण होय' असे ज्ञानेश्वरानी म्हटले असल्याचा जो उल्लेख बागुलानी केला आहे, तो तेथील विवेचनाशी सुसंगत ठरणारा नाही. ज्ञानेश्वरांच्या त्या उद्‌गाराचा विषय मी–तूपणाचा किंवा द्वैतभावनेच्या आवश्यकतेचा नसून, देह हा कर्माचाच बनलेला असताना देहधारी पुरुषाने कर्म सर्वथा टाकण्याचा आग्रह धरणे हा वेडेपणा आहे, असा कर्माच्या अपरिहार्यतेचा आहे. किंबहुना तेथवर मी–तूपणाविषयी जे काही त्या लेखामध्ये सांगितले गेले आहे त्या दृष्टीने तो शेवटचा सारा परिच्छेदच उपरा वाटणारा आहे.

असे अनवधान. आणखीही कोठे कोठे डोकावते. 'लौकिक ज्ञानेश्वर' उभे करण्याच्या प्रयत्नात काही बेसावध क्षणी अलौकिकत्वाचा पदर सुटतो आणि मग काही विधाने केवळ लौकिक पातळीवरच उभी राहिलेली आढळतात. नवव्या अध्यायातील 'तरी अवधान एकले दीजे। मग सर्वसुखासी पात्र होईजे।' या उद्‌गारातील 'सर्वसुखासी' या पदाने सहाव्या अध्यायाच्या प्रस्तावनेत वर्णिलेल्या ऐन्द्रिय सुखप्रकारांचा निर्देश ज्ञानेश्वराना करावयाचा आहे, असे बागुलानी म्हटले आहे (पृष्ठ ११); पण नवव्या अध्यायामध्ये येणाऱ्या ज्ञानविज्ञान, ऐश्वरयोग व भक्तिमहिमा या विषयांची प्रस्तावना करण्याच्या निमित्ताने ज्ञानेश्वरानी वरील प्रतिज्ञोत्तर ऐकविले आहे, असे म्हणणे अधिक सयुक्तिक होईल आणि ते मान्य केले तर बागुलांच्या विधानाचा पुनर्विचार करावा लागेल. सतांनी अवधान द्यावे ही ज्ञानेश्वरांची विनती स्पष्ट करून सागत असताना त्यातील अवधानकल्पना बागुलांनी मोठ्या मार्मिकपणाने विशद केली आहे; पण त्या मानाने 'सती' हे पद त्याच्या अवधानाचे लक्ष्य झालेले नाही आणि ओळीच्या पूर्वार्धातील 'अहो अर्जुनाचिये पाती। जे परिसणेया योग्य होती।' या शब्दांमध्ये त्या संतांचे लक्षण ज्ञानेश्वरांनी स्पष्ट केले आहे. तिकडे तर त्याच्या अवधानाचा मोहरा वळलेलाच नाही असे म्हणावेसे वाटते. ज्ञानेश्वरांची रसिकता ही अखेर अरूपाचा वेध घेते आणि त्या अरूपाला रूप देण्यासाठी ते ऐन्द्रिय सवेदनांची ही परिभाषा योजीत आहेत. श्रोत्याच्या आकलनाच्या सोयीसाठी त्यांना हे माध्यम पत्करावे लागले आहे, हे विसरून चालणार नाही. अर्जुनाच्या पंक्तीस बसून श्रवण करण्यास कोणते श्रोते योग्य ठरतील हे ज्ञानेश्वरांनीच अर्जुनाचे जे चित्र आणि त्याचे श्रीकृष्णाशी असलेले जे नाते वर्णिले आहे, आणि ज्याचे मोठे हृद्य दर्शन बागुलानीही 'मित्रकल्पना' व 'मी–तूपणा' या आपल्या लेखामधून येथे घडविले आहे,– त्यांवरून पाहता येण्यासारखे आहे.

ज्ञानेश्वरानी गुरुकृपेचे अपार महत्त्व सांगितले आहे. त्याचे विश्लेषण करताना, कोठे तरी लहानपणाचे नाते घेऊन वावरावयास मिळावे ही मानवी मनाची एक गरजच असते व ज्ञानेश्वरांनी केलेली 'गुरुप्रशस्ती' ही त्या मानवी सर्वसामान्य गरजेची प्रतिनिधी' आहे, असे बागुलानी म्हटले आहे (पृष्ठ १६). 'उद्धरेदात्मनात्मानम्'चा अर्थ व त्याचे मर्म ज्ञानेश्वरांना माहीत होते आणि तरीदेखील ते गुरुविषयी जो अपार आदरभाव दाखवितात त्याचा हा एक उलगडा करण्याचा प्रयत्न बागूल करतात. त्यानी केलेल्या या माडणीमुळे अतिमानवी भासणारे ज्ञानेश्वर कोठे तरी आपल्या मानवी पातळीवर आल्यासारखे वाटते व त्यामुळे आपण त्याच्या निकट पोचल्याचे समाधान लाभते हे खरे, पण केवळ लौकिक पातळीवरच वावरत राहणाऱ्या आपल्यासारख्या सामान्य माणसाना पडणारी गरज अद्वैतानुभवाच्या गहन प्रदेशात सुखाने विहरत असणाऱ्या ज्ञानेश्वराना कितीशी असेल असे मानावे, असा एक प्रश्न मनात आल्याशिवाय रहात नाही.

## ज्ञानेश्वरांचे काव्यात्म उद्‌गार

ज्ञानेश्वराच्या अशा प्रकारच्या काव्यात्म व अलंकारिक उद्‌गारांच्या आधारे त्याच्या गूढ मनाचा वेध घेताना व त्याबाबत काही निष्कर्ष काढताना फार सावध राहावे लागेल. कसे तरी करून श्रोत्याना आपण प्रिय व्हावे म्हणून ज्ञानेश्वरी सांगण्याचा हा हव्यास आपण चालविला आहे, अशा अर्थाचा ज्ञानेश्वराचा एक उद्‌गार देऊन बागूल असे म्हणतात की, 'ज्ञानेश्वरी-लेखनाचे कारण इतके प्रेमळ आणि वैयक्तिक असलेले पाहून त्या प्रेमाचे सौन्दर्य अधिकच हृदयस्पर्शी होते.' (पृष्ठ ४७). या वाक्याचा उत्तरार्ध, लहानांमध्ये लहान व्हावे त्याप्रमाणे अलौकिक असे ज्ञानेश्वर तुम्हा-आम्हा श्रोत्यांसाठी व्यावहारिक पातळीवर उतरून कसे बोलतात हे दाखविण्याच्या दृष्टीने समर्पक

आहे; पण त्याच्या पूर्वार्धात ज्ञानेश्वरी-लेखनाचे प्रयोजन विशद करताना ज्ञानेश्वरांना फारच लौकिक पातळीवर खेचून आणल्यासारखे वाटते. श्रोत्यांना आपण प्रिय व्हावे हे ज्ञानेश्वरांनी सांगितलेले प्रयोजन सिद्धान्तरूप म्हणून पत्करावयाचे असेल, तर 'इये मराठीचिये नगरी । ब्रह्मविद्येचा सुकाळु करी ।' अशा प्रकारच्या सर्वप्रसिद्ध उद्‌गारांचा अर्थ काही तरी निराळा लावावा लागेल. ज्यांचे व्यक्तिमत्त्व केवळ अपार्थिव होते असे बागूलही सांगतात त्यांचे नाते, ज्ञानेश्वरीचे जर कोणी श्रोते प्रत्यक्षात त्या वेळी असतीलच तर, त्यांच्याशी कोणत्या प्रकारचे असेल हे निर्विवाद सांगणे पुराव्याच्या अभावी अशक्य आहे; पण निदान एवढे खरे की, ते नाते आपण लौकिकात मानतो त्या अर्थाने 'प्रेमळ व व्यक्तिगत' असू शकणार नाही. जरी साक्षात ज्ञानेश्वरांचे उद्‌गार असले तरी 'प्रभू तुम्ही महेशाचिया मूर्ती ।' हे समोर बसलेल्या श्रोत्यांचे, तर 'आणि मी दुबळा अचितसे भक्ती ।' हे ज्ञानेश्वरांच्या भूमिकेचे वास्तव वर्णन आहे, असे मानून चालणार नाही. खरे तर बागूलही हे जाणतात; पण ज्ञानेश्वरांसारख्या विरक्त पुरुषाची 'प्रेमाची जाती' वर्णन करताना ते येथे भारावून गेले आहेत इतकेच.

## ज्ञानेश्वरांची साहित्यनिष्ठा


ज्ञानेश्वरांचे साहित्यप्रेम विख्यात आहे. निरंतर अध्यात्मिक धारणेत वावरणाऱ्या या पुरुषाला साहित्याचे असे विलक्षण प्रेम आहे हे पाहून आपल्याला फार बरे वाटते, त्यांच्याशी एक जवळिकेचे नातेच त्यामुळे उत्पन्न होते. वाटते, हे तर आपल्यातीलच आहेत. हे सारे स्वाभाविक आहे; पण असे समाधान अनुभवीत असताना ज्ञानेश्वरांच्या असामान्यत्वाचे विस्मरण झाले तर? तर आपण बरेच काही गमावून बसू आणि त्यामुळे त्यांच्याशी जुळणाऱ्या आपल्या नात्यातील धन्यतेचा गंधच नष्ट होऊन जाईल. ज्ञानेश्वरांच्या साहित्य-प्रेमाचे वर्णन करताना बागुलांनी साहित्यनिष्ठा असा शब्द योजला आहे. निष्ठा हा शब्द निवडताना त्यांच्या मनात कोणती कल्पना आहे ते ठरविता येत नाही; पण या शब्दामुळे असा समज उत्पन्न होतो की, ज्ञानेश्वरांची साहित्याविषयीची प्रीती किंवा बांधिलकी ही त्यांच्या जीवनातील सर्वांत महत्त्वाची गोष्ट होती. ती तशी नव्हती हे आपल्याला पुरते माहीत आहे. ज्ञानेश्वरांना साहित्याचे काही विशेष प्रेम आहे आणि हरएक प्रकारच्या सौंदर्याची त्यांना एक विलक्षण जाण आहे, हे निखालस सत्य आहे; पण हे प्रेम व ही जाण हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील सर्वांत महत्त्वाचा व इतर साऱ्या अंगांना उजळून टाकणारा असा केन्द्रवर्ती घटक मानता येईल का? तो त्यांच्या जीवनाचा मूल स्रोत असे म्हणावयाचे का? साहित्यनिष्ठा या शब्दातील निष्ठा या पदामुळे तसा भास होतो.

ज्ञानेश्वरांचे व्यक्तिमत्त्व हे एका अपार्थिव पातळीवरील आहे हे बागूल पुन्हा पुन्हा सांगतात आणि ते पूर्णपणे खरे आहे. हे अपार्थिवत्व त्यांना कशामुळे लाभले? ते त्यांच्या असाधारण अध्यात्मिकतेमुळे लाभले. या अध्यात्मिकतेमुळे जी एक निराळीच निर्लिप्तता येते, तीमुळे ज्ञानेश्वरांच्या सौंदर्य-वृत्तीला एक उदात्तत्व प्राप्त झाले. 'रसिकत्वी परतत्त्वस्पर्शु' या त्यांनी एके स्थळी केलेल्या शब्दयोजनेतील आशय हाच आहे. ज्ञानेश्वरांनी केलेल्या निर्भर अशा साहित्य-गौरवामुळे आपल्याला जो आनंद होतो, त्याच्या भरात त्यांची मूळ जीवननिष्ठा वेगळी होती व त्या जीवननिष्ठेमधून त्यांच्या साहित्य-प्रेमाला पोषण मिळालेले आहे याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. या गीतारूप अध्यात्मशास्त्रात एक अंतरंगाचाच अधिकार आहे असे त्यांनी बजावून सांगितले आहे आणि तो ज्यांना प्राप्त झालेला नाही ते 'येरू लोक वाक्‌चातुर्यें सुखिया' होतील, असा अभिप्राय व्यक्त केला आहे. त्यांच्या साहित्यप्रेमाचा द्योतक म्हणून निष्ठा हा शब्द योजताना हे सारे ध्यानात घ्यावयास हवे. किंबहुना 'लौकिक ज्ञानेश्वरां'चा शोध घेताना त्यांच्या अलौकिकत्वाचे भान सतत राखणे आवश्यक आहे.

एवढे आनंदाने मान्य करावयास हवे की, क्वचित कोठे हे अवधान सुटल्यासारखे वाटले तरी बागुलांना हे भान आहे आणि तसे ते असल्यामुळे त्यांच्या या साऱ्या लौकिकत्वाच्या विवेचनाला अलौकिकत्वाचे काही अधिष्ठान लाभलेले आहे. त्यामुळेच त्यांचे हे प्रवाही शैलीने नटलेले व अभिजात अभिरुचीने दरवळलेले छोटे छोटे ललित निबंध वाचताना मनाला एक वेगळा आल्हाद होतो. सुगंधी पुष्पांनी बहरलेल्या ताटव्यांच्या उद्यानातून फेरफटका मारताना मन प्रसन्न होऊन जावे, तसा अनुभव या पुस्तकाची पाने उलटताना वाचकाला येतो. हे तर एक छोटेसे पुस्तक बागुलांनी आम्हाला दिले आहे. असे आग्रहाने सुचवावेसे वाटते की, त्यांच्या रसिक आणि मर्मज्ञ वृत्तीला जाणवणारे असे आणखी बरेच काही त्यांनी वाचकांना द्यावे. ते सर्वांना हवेहवेसे वाटणारे आहे.

—डॉ. वि. रा. करंदीकर

**लौकिक ज्ञानेश्वर**
लेखक : देविदास बागूल
अनुरूप प्रकाशन
पृष्ठे ५१
मूल्य सहा रुपये



# लोकाश्रयी संस्था व ग्रामीण विकास प्रकल्प

जनतापक्ष सत्तेवर आल्यानंतर नियोजनात ग्रामीण भागावर भर देण्याचा विचार सर्वत्र मांडला जात आहे. यासाठी ग्रामीण भागात काम करणाऱ्या लोकाश्रयी सेवाभागी (Voluntary agencies) संस्थांचे सहकार्य आवर्जून घेण्याचा प्रयत्नही शासनातर्फे, नियोजन-मंडळातर्फे सुरू आहे. या प्रयत्नाला मदत व्हावी या उद्देशाने 'ग्रामायन' संस्थेने पुणे येथे दिनांक २६ व २७ नोव्हेंबरला अशा जवळपासच्या संस्थांच्या कार्यकर्त्यांची एक छोटी बैठक आयोजित केली होती. या बैठकीसमोर विचारार्थ ठेवण्यात आलेले हे एक टिपण—

**शरद कुलकर्णी**

ग्रामीण विकासाच्या प्रक्रियेत लोकाश्रयी सस्था सरकारपेक्षा काही बाबतीत अधिक उपयुक्त ठरतात. एक तर या सस्थांजवळ कार्यक्षम व ध्येयप्रेरित असे मनुष्यबळ असते. त्यांना त्या विभागाची बरीच माहिती असते व सरकारी कामकाजातील लाल फितीचा कारभार त्या टाळू शकतात. मात्र एक–दोन बाबतीत त्या सरकारपेक्षा कमी पडतात. सरकारी कारभाराला असलेले दंडबल (सँक्शन) त्याना नसते. त्यामुळे त्यांना विरोध करणाऱ्यांना त्यांच्या कार्यात सहज अडथळे आणता येतात. या संस्थाच्या राजकीय व सामाजिक भूमिकेविषयी गैरसमज पसरविणे सहज शक्य होते. तसेच या संस्थाची देणी बुडविल्यास किंवा इतर नुकसानी केल्यास ती कोर्टामार्फत भरून घेणे फार खर्चाचे व दिरंगाईचे ठरते. याबरोबर या संस्थांच्या संचालकांच्या सघटना-कौशल्याची मर्यादाही त्यांच्या विकास-कार्यक्रमाला पडते. एखादा विकास-प्रकल्प चालविणारा सरकारी अधिकारी कमी पडला तर त्याची बदली करता येते. लोकाश्रयी संस्थेचे चालक मात्र या कारणासाठी बदलले जात नाहीत. ग्रामीण विकास-प्रकल्प आखताना लोकाश्रयी सस्थांनी त्यांच्या मर्यादा जाणूनच असे प्रकल्प हाती घेतले पाहिजेत.

ग्रामीण विकास-प्रकल्प सर्वसाधारणपणे १०,००० ते ६०,००० एवढ्या लोकसख्येपुरते मर्यादित असावेत. फार छोट्या लोकवस्तीपुरते कार्यक्रम सघन असले तरी एकूण विकासावर परिणाम करू शकत नाहीत. फार मोठ्या लोकवस्तीसाठी कार्यक्रम घेतल्यास ते फारसे सघन असू शकत नाहीत. त्याची अंमलबजावणी नीट होत नाही व त्यामुळे एकूण विकासावर त्याचा फारसा परिणाम होत नाही. म्हणून सस्थांनी किमान १०–१२ गावे व कमाल ६० गावे या मर्यादेपर्यंत आपला गट निवडावा.

आज ग्रामीण भागात करता येण्यासारखी मुख्य कामे शेती व छोटे उद्योग याचा विकास, वैद्यकीय सुविधा व आरोग्यपोषण यासबधी व इतर शिक्षण हे आहेत. शेतीच्या विकासासाठी विहिरी, उपसा-सिंचन ही भाडवली कामे करता येतील. त्याशिवाय शेतीला पूरक असे शास्त्रीय ज्ञान शेतकऱ्यांना देता येईल. शेतीला लागणाऱ्या साधनसामुग्रीचा पुरवठा व उत्पादनाला योग्य बाजारपेठ याची अधिक चागली व्यवस्था करता येईल.

ग्रामीण व छोट्या उद्योगधद्यांच्या व कुटीर-उद्योगाच्या बाबतीत आजकाल फार जोराने बोलले जाते; पण या बाबतीत कोणतीही गोष्ट करण्याअगोदर आपल्या विभागात निश्चित कोणते उद्योग चालतात व त्याच्या विकासाला त्या भागात कितपत वाव आहे याची पहाणी करणे आवश्यक आहे. नाही तर एखाद्या व्यवसायाचे शिक्षण द्यावयाचे व शिक्षण घेतलेले बेकार रहावयाचे अशी परिस्थिती होईल.

महाराष्ट्रात ग्रामपंचायतीत रूरल इंडेक्स कार्ड तयार असते व त्यात गावातील शेतीसबधी व इतरही काही बाबतीत विस्तृत माहिती असते. त्याचप्रमाणे जिल्हा शिरगणना पुस्तकात गावातील एकूण लोकसंख्या, उद्योगधद्यानुसार त्याचे विभाजन, साक्षरता याविषयी माहिती असते. अर्थात चालू पुस्तकातील माहिती १९७१ सालची आहे. तरी पण ग्रामीण विकासाचे कार्य करू इच्छिणाऱ्यांनी प्रथम आपल्या विभागाविषयी उपलब्ध माहिती संकलित करणे आवश्यक आहे.

लोकाना वैद्यकीय सुविधा मिळवून देणे हेही एक उत्पादनाला मदत करणारेच कार्य आहे. या सुविधा सध्या बहुजन लोकाना मिळत नाहीत याची दोन कारणे आहेत.

एक तर अनेक अंधश्रद्धांमुळे लोक या सुविधांचा फायदा अगदी जिवावर बेतल्याखेरीज घेत नाहीत आणि कित्येकदा घ्यावयास तयार होतात त्या वेळी केस हाताबाहेर गेलेली असते. अशा वेळी रोगी दगावल्यास त्याचा दोष आपण वेळेवर उपचार केले नाहीत म्हणून आपल्याकडे येण्याऐवजी डॉक्टरकडे व वैद्यकीय सुविधाना दिला जातो. या गोष्टीला भगत, मौलवी, मान्त्रिक उत्तेजन देतात व आपली उणीव डॉक्टरच्या माथ्यावर मारून मोकळे होतात. सुदैवाने या अधश्रद्धा हळूहळू कमी होत आहेत. दुसरे म्हणजे आधुनिक वैद्यकीय सुविधा बहुसंख्य गरीब लोकांना परवडतील अशा उपलब्ध नाहीत. सरकारी प्राथमिक

# माणूस

अखेर सर्व मानवी व्यवहाराचा हाच केंद्रबिंदू आहे !
व्यापारामध्ये नि उद्योगधंद्यामध्येही !
मग तो यंत्रोद्योग असो की रसायनोद्योग असो !
औषधी उत्पादन असो की सेल्फॉससारखे महाविषारी
जंतुनाशकाचे उत्पादन असो !

**' माणूस ', माणसाचे हित, माणसाची महत्ता नि प्रतिष्ठा हाच**
**सर्व उलाढालींचा गाभा असायला हवा.**

## एक्सेलमध्ये

अनेक संयंत्रे–यंत्रे–प्रक्रिया–कार्यरत असल्या तरी येथेही माणसाची प्रतिष्ठा
हीच सुप्रतिष्ठित झालेली आहे.

**एक्सेल इंडस्ट्रीज लिमिटेड**
१८४/८७, स्वामी विवेकानंद रोड,
पोस्ट बॉक्स ७४७४
जोगेश्वरी
मुंबई – ४०० ०६०

आरोग्य केंद्रात देखील चांगली औषधे पैसे देणाऱ्यालाच देतात. गरीब रोग्याना हिडिस-फिडिस केले जाते. एखादे आधुनिक हॉस्पिटल उघडून लोकाच्या अनारोग्याचा प्रश्न सुटणार नाही. त्या दृष्टीने कार्यकर्त्यांना महाराष्ट्रात चाललेले दोन–तीन प्रयोग पहाण्यास सांगावेसे वाटते. अहमदनगर जिल्ह्यात जामखेड येथे डॉ. आरोळे पति-पत्नींनी ग्रामीण स्त्रियांनाच आरोग्यसेवा देण्यासाठी तयार केले आहे. हा प्रयोग तेथे सुमारे दहा वर्षे चालू आहे. वेरूळ येथे श्रीमती ताई बस्तीकर यांनी आरोग्यसेवा व पोषण याचे ज्ञान देण्यासाठी ग्रामीण स्त्रियांनाच करताना तयार केले आहे. या पद्धतीने दारिद्र्यरेषेखाली असणाऱ्या बहुसंख्य लोकाचा प्रश्न सोडविता येईल. ग्रामीण विकास-प्रकल्पात अशा प्रकारचा एक भाग असणे आवश्यक आहे. मात्र अशा प्रकारचे कार्यक्रम ज्या विभागात घेतले जातील तेथील गावातील गेल्या ५ वर्षांतील जन्म-मृत्यूची माहिती कार्यकर्त्यांनी मिळवून ठेवावी. त्याच्याशी तुलना करून आरोग्य पोषण कार्यक्रम किती यशस्वी झाला हे पहाता येईल.

ग्रामीण विकास प्रकल्पात अनौपचारिक शिक्षणाचा समावेश होणे आवश्यक आहे. प्रकल्पाची कार्यपद्धती व उद्दिष्टे लोकांना समजावी म्हणून शिबिरे घ्यावी लागतील. तेथे ठोस व्याख्याने न ठेवता लोकाशी अर्थपूर्ण सवाद करावे लागतील. विकासप्रकल्प विभागात तेथील प्रश्नाविषयी सामुदायिक जागृती करण्याचे काम तेथील तरुण मडळे, महिला मडळे याच्याकडून जास्त परिणामकारक करता येईल. अनौपचारिक पद्धतीने आरोग्य-पोषणशिक्षण, व्यवसायशिक्षण व शेतीविषयक शिक्षण देता येईल. शक्य तेथे तरुण निरक्षरांसाठी प्रौढ शिक्षणवर्ग चालविता येईल. शैक्षणिक बाजूशिवाय लोकाश्रयी संस्थांनी चालविलेले ग्रामीण विकास प्रकल्पही सरकारी प्रकल्पाच्या स्वरूपाचेच होतील. शिक्षणाशिवाय या प्रकल्पात लोकांचा सक्रीय सहभाग मिळणार नाही.

ग्रामीण विकास प्रकल्प आखताना आपण निश्चित कोणते काम करणार आहोत हे कार्यकर्त्यांनी ठरविले पाहिजे. कोणत्याही प्रकल्पाचे फायदे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष प्रकारचे असतात. अप्रत्यक्ष फायदे लोकांना मिळतात. उदा. दुष्काळी कामाचा अप्रत्यक्ष फायदा गावातील दुकानदारांना मिळतो व प्रत्यक्ष फायदा काम करणाऱ्यांना मजुराना मिळतो. कोणत्या गटासाठी काम करावयाचे हे निश्चित झाल्यावर कोणत्या कार्यक्रमाचा जास्त फायदा त्या गटाला मिळेल हे बघून त्याप्रमाणे कार्यक्रम हाती घेता येईल.

सरकारी मदतीने घ्यावयाच्या प्रकल्पात हिशेब व पत्रव्यवहार याची फार मोठी जबाबदारी आपणावर येईल हे सर्व संस्थानी लक्षात घेतले पाहिजे. प्रामाणिकपणा व सद्हेतू यावर नेहमी कारभार चालतो असे नाही तर अंतरंगाएवढेच बहिरंगही स्वच्छ ठेवावे लागते

ग्रामीण विकास प्रकल्पाच्या योजना सविस्तर आखण्याआधी कार्यकर्त्यांनी कोसबाड येथील कृषी शिक्षण सस्था, वेरूळ येथील कैलास ट्रस्टने चालविलेले कारखाने व इतर काम आणि डॉ. आरोळे यांचे जामखेड भागातील कार्य अवश्य बघावे असे वाटते. या तिन्ही प्रकल्पात शेतीविकास, औद्योगिक विकास व आरोग्य सुविधा व शिक्षण या गोष्टीसाठी केलेले प्रयत्न अनुकरणीय आहेत. □

---


## प्रकाशित झाले

# टच

**कालच्या बायसिकल थिव्हज्‌पासून आजच्या चोमाना डुडीपर्यंतच्या पंधरा देशी–विदेशी चित्रपटांची ओळख**

अशोक प्रभाकर डांगे

**राजहंस प्रकाशन, पुणे ३०.**

**दहा रुपये**

टॉलस्टॉय पुस्तक योजनेतील सभासदांनी आपले पुस्तक ५ डिसेंबरपासून संस्थेच्या कार्यालयातून घेऊन जावे.

लोखंडी गज, पट्टी इत्यादी माल तयार करणारा
नासिक परिसरातील

— अद्यावत व भव्य कारखाना —

# राठी री-रोलिंग मिल्स

( गज, अँगल्स, पट्टी, चॅनल इत्यादींचे उत्पादक व एक्स्पोर्टर्स )

वैशिष्टये : (१) रोज ३० ते ३५ टनांची उत्पादनक्षमता.

(२) फक्त टेस्टेड Ingots व billets पासून उत्पादन.

(३) २० टन लॉरी वजनाचा डायलटाइप काटा त्यामुळे अचूक वजन.

(४) त्वरित व थेट ग्राहकापर्यंत माल पोचविण्याची खास व्यवस्था.

☆

**सेल्स ऑफिस** – गिरिधरवाडी, गंगापूररोड, नासिक – २.

फोन नंबर : २२६६, ५४६६

□

**कारखाना** – प्लॉट नंबर ई - १० व ११ सातपूर, नासिक ७.

फोन नंबर : ८४६३, ८१६३

## हिंदी चित्रपट

# मंथन

**मोहिनी वर्दे**

श्याम बेनेगल यांच्या चित्रपटांबद्दल नेहमीच कुतूहल वाटत आले आहे. त्यांच्या 'मंथन' ह्या तिसऱ्या चित्रपटाला देखील सरकारी पारितोषिक मिळाले. एकापाठोपाठ तीन चित्रांना रसिकांची पावती मिळाली.

स्त्रियांच्या अंगप्रत्यंगांचे प्रदर्शन करणारे गल्लाभरू चित्रपट मुंबईत चालू आहेत. तरीही मेट्रो थिएटरमध्ये एका आदर्शाच्या पाठीमागे लागणाऱ्या व्यक्तीच्या जीवनाचे निखळ चित्रण घडविणारा चित्रपट लागला आणि त्याला लोकांनी गर्दी केली.

'मंथन' चित्रपटाचे शीर्षक फार बोलके आहे. दह्याचे घुसळण करून लोणी काढण्याची ही क्रिया. गुजरातमधील एका खेड्यातील जीवनाचे असे मंथन झाले. तरी सुखी जीवनाचे नवनीत सहजतेने प्राप्त होऊ शकले नाही. गिरीश कर्नाड यांनी मुख्य भूमिका केली. हा जनावरांचा डॉक्टर सहकारी डेअरी सुरू करण्यासाठी एका खेड्यात जातो. गुजरातेतील ह्या प्रादेशिक जीवनाशी एकरूप होण्याचा प्रयत्न करतो. तेथील जातीयता, तेथील लोकांचे पूर्वग्रह, तेथील लोकरीती, परंपरा, आर्थिक विषमता. स्थानिक सत्ताधीश व धनवानांचा वर्ग यामधून निर्माण झालेले अनेक ताण—तणाव, भावनिक संघर्ष यांचे कलात्मक चित्रण ह्या चित्रपटात केले आहे.


सहकारी डेरी सुरू करण्याचा प्रयत्न हा फीचर फिल्म किंवा मनोरंजनात्मक चित्रपटाचा विषय कसा होऊ शकतो? ह्या विषयावर उत्तम माहितीपट होऊ शकेल व ते तसे निघालेही आहेत. डॉ. कुर्यन ह्या केरळमधल्या दूधतज्ज्ञांनी हा प्रयत्न प्रत्यक्षात आणला. गुजरातमधील 'आनंद' जवळपासच्या खेड्यांतून त्यांनी हा सहकारी डेअरी स्थापन करण्याचा प्रयत्न केला. त्यांना अनंत संकटांना तोंड द्यावे लागले. 'रीडर्स डायजेस्ट' ह्या जगद्विख्यात मासिकात डॉ. कुर्यन ह्यांच्या असामान्य कर्तृत्वावर लेख प्रसिद्ध झाला. त्यांच्या चिवट प्रयत्नाने मानवी इच्छाशक्तीचा पुन्हा एकदा विजय झाला. डायरेक्टर प्रोड्यूसर शाम बेनेगल ह्यांनी ह्या जीवनातून प्रेरणा घेऊन चित्रपट काढला.

याअगोदरचे बेनेगल यांचे 'अंकुर', 'निशान्त' यामधील संघर्ष ज्वलंत होते. काही अंशी भडक होते. त्या व्यक्तिप्रधान चित्रपटांपेक्षा 'मंथन' वेगळा आहे.

शुद्ध व्यवहाराच्या पातळीवर घडणाऱ्या अनेक प्रसंगांतही एखाद्या व्यक्तीची भावनिक गुंतागुंत होत जाते. मिश्रा नावाच्या श्रीमंत डेअरीमालकाने हरिजन गवळ्यांना फितविलेले असते व त्यांना खोटी आमिषे दाखवून त्यांनी आपल्याला दूध विकावे म्हणून त्याचे प्रयत्न चालू असतात. अशा वेळी 'भोला' हा हरिजनातला एक, पण नव्या योजनेवर पूर्ण श्रद्धा असलेला हरिजन रागावतो, चिडतो. त्यांना मिश्राची लबाडी समजावून सांगण्याचा प्रयत्न करतो, रुसतो, निराश होतो. त्याचा मनक्षोभ त्या छोट्याशा प्रसंगातल्या चित्रणाला उठाव देतो.

स्मिता पाटीलने भूमिका केलेली 'बिंदा' डॉक्टरवर मोहित होते. दारुड्या नवऱ्याची ही पत्नी व एका मुलाची आई कमरेवर मुलाला घेऊन डॉक्टरांची वाट पाहात तास न् तास उभी राहाते. एका नाजूक क्षणी डॉक्टर व ती क्षणभर जवळ येऊन जातात. त्या क्षणाचा ती अव्हेर करते. डॉक्टर भानावर येतो व त्याच्या दृष्टीने ते नाते तेथेच संपते. तिच्यावर संकटे येतात. तिची म्हैस मरते. तिला कर्ज हवे असते. तिचा पती तिचा छळ करतो. आपल्या मनचे गूज ज्याला उमगेल त्या डॉक्टरशी दोन शब्द बोलण्यासाठी ती तळमळते. त्याच्या जाण्यायेण्याच्या वाटेवर डोळे लावून बसते; पण तिची भेट होत नाही. तिने जपलेले ते थरथरते गूढ क्षण शेवटपर्यंत गूढच राहातात.

'माझे खाण्यापिण्यात, कामात कशाकशात लक्ष नाही रे! तू मला वेड लावले आहेस! एकदा येऊन जा एकदा पाहून जा... म्हारा घर अंगना ना भूलो ना!' हे आर्जवी गुजराती गीत पार्श्वभूमीवर गायले जाते. मनाला चटका लावणारा हा प्रसंग ह्या रुक्ष व्यवहारी जगण्यातले एक आगळे सौंदर्य व्यक्त करतो.

जनावरांच्या डॉक्टरवर कोवळ्या मुलाला जाड सुईने इंजेक्शन देण्याची पाळी येते. त्याचे सहकारी त्याबद्दल नापसती दर्शवितात भलते औषध देऊ नये असा सल्ला देतात. तेव्हा, भर रात्री खेड्यात मृत्युपथाला लागलेल्या मुलाला वाचवण्यासाठी 'do you have any alternative plan?' असा रोकडा प्रश्न डॉक्टर करतो व मानवाची अशी असमर्थता तेथे प्रकट होते.

खेड्यातील लोकाचा विश्वास मिळविण्यासाठी तडफडणाऱ्या डॉक्टरचा एक सहकारी महारवाड्यातील तरुण मुलीला भुलवितो. आपल्याच पायाखालची वाळू वाहून जातेय याचा प्रत्यय आल्याक्षणी त्या सहकाऱ्याला 'चंदावरकरला' तो रातोरात तेथून घालवून देतो. त्या क्षणाचा त्याचा प्रक्षोभ ज्वालामुखीचे रूप धारण करतो. ध्येय कितीही उदात्त असले व सहकारी कितीही विश्वासू असला तरी प्रत्येक जण मोहावर मात करू शकेल हे शक्य नाही. एखाद्याच्या मनाची शक्ती कमी पडणार, त्याची जबाबदारी नेत्यावर पडणार. हे एक व्यवहारी सत्य आहे त्या प्रसगातून हे जाणवते.

खेड्यातील समाजात शोषणकर्त्यांचा वर्ग मिश्रा आणि सरपंच ह्यांच्या द्वारे उभा केला आहे. शिवाय हरिजनाचा एक वर्ग आणि इतर समाज अशी त्या समाजाची एकूण विभागणी आहे त्यांची जीवनपद्धती ठरलेली आहे. त्या समाजात नव्याने प्रवेश करणाऱ्या परक्या माणसाला त्याच्यातील एक बनण्यासाठी फार मोठी किंमत द्यावी लागते. शारीरिक व मानसिक दोन्ही पातळ्यांवर झगडावे लागते. कष्ट घ्यावे लागतात. आज भारतात नवसमाज निर्माण करण्यात सर्वांत मोठी अडचण असेल तर जुनी मूल्ये पुसून टाकणे. मिश्रा आपल्याला दुधाचा योग्य भाव देत नाही हे लोकांना समजावणे एकवेळ डॉक्टरला शक्य होते. परतु अडचणीला कर्ज देण्याची क्षमता मिश्रामध्ये आहे ही गोष्ट त्या खेड्यातील लोकाच्या मनात बिंबलेली असते. सोसायटी कर्ज देऊ शकेल काय? ह्या प्रश्नाचे उत्तर काय द्यायचे? सोसायटीला सभासद मिळाल्याशिवाय सोसायटीकडे पैसे जमणार नाहीत सोसायटी श्रीमंत झाल्याशिवाय गवळी श्रीमत होणार नाहीत. हा विचित्र न्याय असतो. सहकारी सोसायटी म्हणजे मुलीच्या लग्नात कर्ज देणारी कामधेनू नव्हे हे समजावणे कठीण असते. आहे त्यात बदल करायचा व भविष्याची नुसती स्वप्ने पाहायची ह्याला गावातील लोकाची तयारी नसते.

डॉक्टर सहकारी डेअरी निर्माण करण्याच्या आदर्शाने भारलेला असतो; पण त्याचे पाय जमिनीवर रोवलेले असतात. डॉक्टरच्या बायकोला टायफॉइड होतो त्याच वेळी हरिजनवस्तीला आग लागते. मोठ्या मिनतवारीने हरिजनांना त्याने आपल्या बाजूला वळविलेले असते दीनदुबळ्या गृहहीन हरिजनाची हाक त्याच्या कानावर येते. आपल्या ध्येयाला साकार करणारे हरिजन सकटात आहेत ही जाण येते आणि प्रिय पत्नीच्या आजारपणातले आपले कर्तव्य, प्रेम याच्या कात्रीत त्याचे मन सापडते. 'शांता प्लीज' एवढ्या शब्दांनी पत्नीच्या अंगावरचे पाघरूण सारखे करून तो तिचा निरोप घेतो व हरिजनवस्तीकडे धाव घेतो. दिग्दर्शकाने हा प्रसंग व असे कित्येक प्रसंग संयमाने हाताळले आहेत.

सिनेमासारख्या दृश्य माध्यमामध्ये भडकपणा, उथळपणा निर्माण करणे सोपे असते. प्रेक्षकाच्या भावनांना आवाहन करून अश्रूंची बरसात करविणे सहज जमून जाते; परतु विचार करायला लावणे कठीण असते. शाम बेनेगलसारखा समर्थ दिग्दर्शक, गिरीश कर्नाड, स्मिता पाटील, अमरीश पुरीसारख्या कसलेल्या अभिनेत्यांनी गुजरातेतील समाज, खेडवळ जीवन जिवत केले आहे. विजय तेंडूलकरांनी चित्रकथा लिहिली आहे. गतिमान संवाद, सूचक चित्रीकरण, नैसर्गिक पार्श्वभूमी, प्रभावी दिग्दर्शन आणि उत्कृष्ट अभिनय याचा फार सुदर मिलाफ झाला आहे.

चित्रपट सुरू होऊन सपेपर्यंत क्षण आणि क्षण आजच्या भारतातील समस्यांची कलात्मक आणि उत्कट जाणीव होत राहते. चित्रपटाचा शेवट होतो; पण समस्या सुटत नाही. डॉक्टरची बदली होते, तो गाव सोडून जातो. एकटा आला तसा एकटा जातो. सहकारी मागे राहातात. डॉक्टरच्या विरुद्ध असणारा 'भोला' त्याच्या कामाशी समरस झालेला असतो. त्याच्या मनात डॉक्टरनी पेरलेल्या आदर्शाचे बीज अंकुरते. सहकारी डेअरी शेवटी यशस्वी होते की नाही ते काळच ठरवू शकतो. दिग्दर्शक म्हणजे विश्वकर्मा नव्हे की स्वप्ने विकणारा सौदागर नव्हे. अर्धवट विस्कळित रागेत सहकारी डेअरीपुढे गावातील काही लोक उभे असतात. अजून बराच लाबचा पल्ला गाठायचा आहे. येथे चित्रपट संपतो. पार्श्वसगीत चालू असते. चित्रपटाची भावनोत्कटता वाढत जाते. एक विशुद्ध जीवनदर्शन घडविणारी उत्कृष्ट कलाकृती म्हणून 'मंथन' दीर्घकाळ स्मरणात राहील, याबद्दल शंका राहत नाही. □


## SOME NEW TITLES RECEIVED

1. **An Auto biography – ( A readable & candid autobiography ) –K. M. Panikkar** Rs. 70–00
2. **Bombay By Night – ( Read what goes on in the fun flats, massage parlours. Bombay is a riot of fun and sex ) – Captain F. D. Colaabavala** Rs. 5–00
3. **Yehudi Menuhin / Unfinished Journey – ( Auto biography of a genius )** Rs. 75–00
4. **Mahatma Gandhi And His Apostles — ( A different biographical portrait of the Mahatma)– Ved Mehta** Rs. 60-00
5. **Dreams Die Fie First – ( A novel of an editor ) – Harold Robins** Rs. 15–00

**मराठी**

१. **हिंदुस्थानचे दोन दरवाजे** – ( मुंबई व गोव्यावरील लेख ) अ. का. प्रियोळकर रु. १५–००
२. **उगवतीचे रंग** – ( कादंबरी ) –भाल पाटील रु. २५–००
३. **कुटोपट्टीचा वादुला** – ( विनोदी कथा ) –द. पा खाबेटे रु. १०–००
४. **पखाल** – ( विनोदी कथा ) –वसंत सबनीस रु. १०–००
५. **रांगोळी** – ( लेख ) –पु. भा. भावे रु. १३–००

● 'फिनिक्स' कडे नियतकालिके ( वधू ) पुस्तकाशी ( वराशी ) संलग्न झालेली असतात. परतु नियतकालिके माहेरी कधीच जात नाहीत. कारण 'फिनिक्स' च्या पुस्तकाच्या बाहुपाशातच त्याना शाश्वती वाटते ! !

**दि फिनिक्स लायब्ररी**
**७२७ सदाशिव पोस्टासमोर, पुणे ३०.**

यंदाची महाराष्ट्र शासनाची पारितोषिके लाभलेली
दोन ' राजहंस ' प्रकाशने

# टॉलस्टॉय एक माणूस

सुमती देवस्थळे

# श्रीग्रामायन

श्री. ग. माजगावकर

या दोन्ही पुस्तकांच्या नवीन आवृत्त्या
लवकरच प्रकाशित होत आहेत.

राजहंस प्रकाशन । १०२५ सदाशिव, पुणे ४११ ०३०

## न मोडलेले पण वाकलेले संमेलन

पृष्ठ ३ वरून

आणले गेले, नमस्कारचमत्कार व्यासपीठाव वर झडायचे ते खाली झडले. कऱ्हाडच्या साहित्यसंमेलनात दुर्गाबाईंना यशवंतराव चव्हाण स्वागताध्यक्ष असूनदेखील उपस्थित राहणे योग्य वाटले. मग यामागील त्याचे कारण कोणतेही असो. संबंध असा अटळ होतोच, लोकशाही जमान्यात तो पूर्णपणे तोडणे अशक्यच आहे. खेडेगावात लहान समेलने भरवली की हा संबध टाळता येईल अशी दुर्गाबाईंची समजूत असावी. ती भाबडी आहे एवढेच फार तर म्हणता येईल. समजा धारिया उद्घाटक म्हणून राहिले असते तर काय बिघडणार होते? कुठली भूमिका कुठवर ताणत न्यायची याचाही विवेक हवा. कऱ्हाडच्या समेलनात राज्य-कर्त्यांशी असहकार उद्घोषित करणारी आत्यंतिक भूमिका आवश्यक होती. कारण राज्यकर्तेच आत्यतिक बनलेले होते. आज नित्याचे वातावरण आहे. नित्यानित्यविवेकही व्हायला हवा. कवी निरकुश नसतो. त्याचा अंकुश स्वतःचा स्वतःजवळ असतो; इतकेच. आत्मभान जागे करणे हे साहित्यिकाचे समाजातील कार्य असते आणि यासाठी तो मोकळा राहणे, कुठल्याही विशिर्ष्ट हितसंबंधाशी, गटाशी बांधलेला नसणे समाजाच्याच कल्याणाचे असते हितसंबंधी. गट फक्त राजकारणात असतात असेही नाही. धार्मिक, आर्थिक हितसंबंधी गटही आविष्कार-स्वातंत्र्याला तितकेच हानिकारक ठरत आलेले आहेत. असे गट साहित्यिकाची, कलावंताची आत्मजाणीव संकुचित करतात, म्हणून अशा दडपणांपासून शक्य तितके त्याने अलिप्त राहणे चागले, हा दुर्गाबाईंच्या भूमिकेतील ग्राह्यांश आहे; पण तोही कालमानपरिस्थिती पाहून व्यक्त व्हायला हवा. निरपवाद आणि निरपेक्ष असे या मानवी व्यवहारात फार थोडे असते. परस्परावलंबित्व, सापेक्षत्व हाच नित्यक्रम आहे. स्वातंत्र्यवाद्यांनी हा नित्यक्रम ध्यानात घ्यायला हवा. नाही तर राजकारण नको नको म्हणता-म्हणता शेवटी पुण्याचे संमेलन राजकारणमय होऊन बसले तशी गत होऊन बसते. राजकारणाला समोरासमोर योग्य ते स्थान दिले नाही तर ते असा सूड उगवल्यासारखे मागून येऊन गळा धरते. दुर्गाबाईंच्या चहात्यांची एका अर्थी संमेलनात गळचेपीच झाली. विषय-नियामक समितीचे म्हातारे अर्क आणि प्रेक्षकातून निदर्शने करण्यासाठी पुढे आलेले भावेविरोधी तरुण तुर्क यांनी दुर्गाबाईंच्या चहात्याची चांगलीच कोंडी केली. भावे, पु. ल., ठोकळ इत्यादींच्या धावपळीमुळे कोंडी लवकर सुटली हा भाग वेगळा; पण आत्यंतिक भूमिका कुणीच घेतल्या नसत्या तर अशी परिस्थिती निर्माणच झाली नसती हेही ध्यानात घेतले जायला हवे.

### रक्त आणि अश्रू

तिसरा दलिताच्या प्रेरणेचा विचार यापुढे नेहमीच सहानुभूतीने करायला हवा आहे. संमेलनाध्यक्ष भावे यांनी याबाबत घेतलेली भूमिका फार समंजसपणाची व स्पृहणीय आहे. त्यांनी अतिरेकाबद्दल दलिताना मुळीच दोष दिलेला नाही. त्याचा राग दलिताच्या नावाने आपला पुरोगामीपणाचा टेंभा मिरविणाऱ्या पोषाखी डावचटांवर आहे आणि तो रास्तही म्हटला पाहिजे. दलिताचा राग, संताप, आक्रोश स्वाभाविक म्हणून विचारार्ह; पण डावचटांचा सगळाच ढोंगीपणा! भाव्यांना धडा शिकवायला निघालेल्या या मंडळीनी आपल्या स्वत.च्या पायाखालची वाळू किती भुसभुशीत आहे याचा एकदा नीट विचार करावा. भाव्यांनी जो मनाचा मोठेपणा दाखविला तो त्यांनी ओळखण्याचा प्रयत्न करावा. भावे थोडे असहिष्णु झाले असते तर संमेलन उधळले गेले असते, हाणामाऱ्या झाल्या असत्या. भाषणे करून आणि चुकीच्या मुलाखती देऊन भाव्यांनी जे आधी गमवले होते ते संमेलनात प्रक्षुब्ध न होऊन त्यांनी परत मिळवले. भाव्यांची मते शंभर टक्के अमान्य असणाऱ्यांनीही या एका गोष्टीसाठी त्याचे आभारच मानायला हवेत. समेलन गाजले-वाजले कशामुळे, कुणामुळेही का असेना. ते अनेकाच्या स्मरणात राहील ते भावे यांच्या व्यासपीठावरील शेवटच्या या मूक प्रवेशामुळे.

......... हक्काचे स्थान हिरावून घेतले जात आहे. आजवर कुठल्याही स्थानासाठी मानमरातबासाठी प्रयत्न केला नाही. त्या मार्गाकडे फिरकलोदेखील नाही. रसिकांनी, चहात्यानी उदंड प्रेम केले. कीर्ती, वैभव कधी कमी पडले नाही. एका धुंदीत सर्व आयुष्य वेचले. शेवटीशेवटी हे पद अनायासे चालून आले, तेही धडपणे लाभू दिले जात नाही! हा जमाव परतवणे अशक्य आहे का? मुळीच नाही! असे किती तरी समरप्रसंग आजवर घडले; पण कधी माघार घेतली नाही! विरोधकांच्या झुडीच्या झुडी अंगावर घेतल्या-परतवल्या. वादळे उत्पन्न केली; पण वाकलो नाही, मोडलोही नाही! रक्त आणि अश्रूचे आपले शब्दसामर्थ्य कधी उणे पडले नाही. पण आज! अश्रूच फक्त शिल्लक आहेत! आपलीच माणसे. काही क्षुद्र हेतूने, काही प्रामाणिक मतभेदाने, काही केवळ गैरसमजामुळे आपल्याला विरोध करण्यासाठी सरसावून आली आहेत. यांना शात करण्यासाठी आपणच शात राहायला हवे. कारण आज आपण मोठ्या पदावर आहोत. मोठ्यांनी नेहमी क्षमाशील, उदारमनस्क असायला हवे. आपणच जर भडकलो तर मंडप उधळला जाईल. सहस्रावधी रसिकाचा अवमान होईल, संमेलनाचा विरस होईल. थोडे वाकावे लागते आहे; पण हे कुणीपरके तर नाहीत? सगळे स्वजनच आहेत! I must stoop down to conquer.

पण हे अश्रू डोळ्यांत गर्दी का करताहेत? सहदेवा......अग्नी आण......!! ☐